रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १९ ◆ अंक ८२
www.ramprahar.com

◆ शुक्रवार, ९ ऑक्टोबर २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

नाना पाटेकरांच्या आठवणींना मुरूडकरांकडून उजाळा/२

गांजा सेवनप्रकरणी दोन जणांवर गुन्हा दाखल/५

गव्हाण विद्यालयाचा खो-खो संघ विजेता/८



# ‘नटसम्राट’ हरपला!

## ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांचे निधन

(1951-2026)

**मुंबई : प्रतिनिधी**

**जबरदस्त अभिनय, बहारदार संवादफेक आणि प्रभावी व्यक्तिमत्त्वाच्या जोरावर मराठी-हिंदी चित्रपटसृष्टी गाजवणारे तसेच नाम फाऊंडेशनच्या माध्यमातून सामाजिक कार्य करून बांधिलकी जपणारे ज्येष्ठ अभिनेते विश्वनाथ उर्फ नाना पाटेकर यांचे गुरुवारी (दि.८) आकस्मिक निधन झाले. ते ७५ वर्षांचे होते. गोव्यात हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने नानांची प्राणज्योत मालवली. त्यांच्यावर पुण्यातील डोणजे येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.**

नाना पाटेकर यांना गोव्यातील दोनापावला येथील घरी मध्यरात्री २ वाजून ३० मिनिटांनी अस्वस्थ वाटू लागल्याने त्यांनी मित्राला त्या संदर्भात मेसेज केला होता, मात्र रात्र असल्याने मित्राने मेसेज पाहिला नाही. मित्राने मेसेज पाहताच ते पहाटे चार वाजता नाना पाटेकर यांच्या निवासस्थानी दाखल झाले. तेव्हा नाना फरशीवर बेशुद्धावस्थेत पडलेले दिसले. त्यांनी तत्काळ केअर टेकरला बोलावून रुग्णवाहिका मागवली. रुग्णवाहिकेबरोबर त्यांचे वैद्यकीय पथकही निवासस्थानी दाखल झाले. वैद्यकीय पथकाने नानांना सीपीआर दिला, पण त्यांच्याकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे त्यांनी मणिपाल रुग्णालयात दाखल केले. तिथेही सीपीआर देण्यात आला, मात्र तोवर उशीर झाला होता. ५ वाजून २० मिनिटांनी त्यांना मृत घोषित केले, अशी माहिती मणिपाल रुग्णालयाच्या ऑन्कोलॉजी (कर्करोग) विभागाचे प्रमुख डॉ. शेखर साळकर यांनी दिली.

### गाजलेले चित्रपट

नाना पाटेकर यांनी मराठीसह अनेक बॉलीवूड चित्रपटामध्ये आपल्या अभिनयाची छाप पाडली होती. क्रांतिवीर, तिरंगा, प्रहार, यशवंत, अग्निसाक्षी, अब तक ५६, टॅक्सी नंबर ९२११, वेलकम अशा हिंदी चित्रपटांमध्ये त्यांनी केलेल्या भूमिका गाजल्या होत्या. मराठीमध्येही सिंहासन, डॉ. प्रकाश बाबा आमटे, नटसम्राट, पक पक पकाक्, देऊळ या चित्रपटांमधील त्यांच्या भूमिका लक्षवेधी ठरल्या होत्या.

नाना पाटेकर यांच्या अभिनयाची जडणघडण रंगभूमीवर झाली. सुरुवातीच्या काळात त्यांनी मराठी नाटकांमध्ये काम केले. त्यानंतर हिंदी चित्रपटसृष्टीत प्रवेश करत १९७८मध्ये आलेल्या 'गमन' या चित्रपटातून त्यांच्या फिल्मी कारकिर्दीला सुरुवात झाली. पुढील काही वर्षांत त्यांनी मराठी आणि हिंदी अशा दोन्ही भाषांतील चित्रपटांमध्ये भूमिका केल्या.

नाना पाटेकर केवळ दिग्गज अभिनेतेच नव्हते तर, सामाजिक भान जपणारे व्यक्तिमत्त्वही होते. सप्टेंबर २०१५मध्ये त्यांनी अभिनेते मकरंद अनासपुरे यांच्या बरोबर 'नाम फाउंडेशन' या धर्मादाय संस्थेची स्थापना केली आणि महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना आधार दिला. या माध्यमातून आर्थिक मदतीसोबतच घरकुल, पाणी, रोजगार, शिक्षण आणि ग्रामीण विकास अशा विविध क्षेत्रांत काम करण्यात आले. नानांनी प्रसिद्धीचा वापर स्वतःचा मोठेपणा दाखवण्यासाठी केला नाही; उलट त्या प्रसिद्धीचा उपयोग गरजू लोकांपर्यंत मदत पोहचवण्यासाठी केला. साधी जीवनशैली, मातीशी जोडलेले नाते आणि समाजासाठी काहीतरी करण्याची कायमची धडपड हीच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची खरी ओळख होती. त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त होत आहे.



हिंदी आणि मराठी चित्रपटसृष्टीतील नाना पाटेकर यांचे योगदान अथांग होते. त्यांनी आपल्या प्रत्येक भूमिकेत अष्टपैलूत्व व सर्जनशीलता आणली आणि आपल्याला अशी अजरामर पात्रे दिली, जी पिढ्यान्‌पिढ्या लक्षात ठेवतील. त्यांच्या जाण्याने कलाविश्वात कधीही न भरून निघणारी एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांच्या कुटुंबियांच्या, मित्रांच्या आणि असंख्य चाहत्यांच्या दुःखात मी सहभागी आहे. ओम शांती!

**-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**



भारतीय चित्रपटसृष्टीचा अभिनय आणि संवेदनशीलतेचा भारदस्त चेहरा ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनामुळे काळाच्या पडद्याआड गेला आहे. नटसम्राट नानांची अशी आकस्मिक एक्झिट धक्कादायक आहे. स्नेही, मित्र म्हणून नानांचे घट्ट ऋणानुबंध राहिले आहेत. त्यांच्या निधनामुळे कला आणि सामाजिक क्षेत्राची मोठी हानी झाली आहे.मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. पाटेकर कुटुंबियांच्या, नानांच्या चाहत्यांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.

**-देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**



माझा अत्यंत जवळचा आणि जिवलग मित्र अचानक निघून गेला. मला अजूनही या बातमीवर विश्वासच बसत नाहीये. तसे हृदयविकाराच्या झटक्याने त्याने जावे असे काही कारणच नव्हते. तो शरीराने अत्यंत फिट आणि कायम स्वतःचा फिटनेस जपणारा माणूस होता. तो अत्यंत सरळ होता. चांगल्याशी चांगला आणि वाईटाशी वाईट. मदत करायला सतत धावणारा माणूस. मुळात, माझा मित्र निघून गेल्याचे हे दुःख मी कधीही विसरू शकणार नाही

**-अशोक सराफ**, ज्येष्ठ अभिनेते

## केंद्रीय पथक महाराष्ट्रात दाखल
## दुष्काळग्रस्त भागांची प्रत्यक्ष करणार पाहणी

**मुंबई : प्रतिनिधी**

खरीप हंगामातील दुष्काळ आणि पिकांच्या नुकसानीची वस्तुनिष्ठ पाहणी करण्यासाठी केंद्र सरकारचे ११ सदस्यांचे आंतरमंत्रालयीन पथक गुरुवारी (दि.८) महाराष्ट्रात दाखल झाले. दुष्काळग्रस्त भागातील पिकांचे नुकसान, पाणीटंचाई आणि अन्य परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेऊन त्याचे मूल्यांकन या पथकाकडून करण्यात येणार आहे.

कृषी, जलसंपदा, ग्रामीण विकास, पाणीपुरवठा, अन्न व सार्वजनिक वितरण, पशुसंवर्धन, अर्थ विभाग, नीती आयोग यांसह संबंधित विभागांतील अधिकाऱ्यांचा पथकात समावेश आहे. कृषी व शेतकरी कल्याण विभागातील पीक विमा विषयाचे संयुक्त सचिव मुक्तानंद अग्रवाल हे पथकाचे नेतृत्व करीत आहेत. क्षेत्रभेटीसाठी केंद्रीय पथकाचे तीन गट करण्यात



आले आहेत. पहिल्या पथकाकडून अहिल्यानगर, सोलापूर आणि पुणे जिल्ह्यांतील दुष्काळी परिस्थितीची पाहणी केली जाणार आहे. दुसरे पथक छत्रपती संभाजीनगर, जालना आणि बीड जिल्ह्यांत जाऊन पिकांचे नुकसान आणि पाणीटंचाईचा आढावा घेणार आहे, तर तिसरे पथक नागपूर, यवतमाळ तसेच लगतच्या टंचाईग्रस्त भागांची पाहणी करणार आहे. प्रत्यक्ष पाहणीतील निष्कर्षांमुळे राज्यातील दुष्काळी परिस्थितीचे क्षेत्रीय वास्तव केंद्र सरकारसमोर अधिक ठळकपणे मांडण्यास मदत होणार आहे.

## दुष्काळग्रस्तांसाठी विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती देणार दोन कोटींची मदत

**पंढरपूर :** राज्यातील दुष्काळसदृश परिस्थिती विचारात घेता सामाजिक उत्तरदायित्व आणि मानवतावादी भूमिकेतून मुख्यमंत्री सहायता निधीस श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती दोन कोटी रुपयांची मदत शासनाची पूर्वपरवानगी घेऊन उपलब्ध करून देणार आहे.

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीची सभा सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी (दि.८) झाली. आगामी कार्तिकी यात्रेच्या अनुषंगाने यावेळी नियोजनाचा आढावा घेण्यात आला. १४ नोव्हेंबरपासून २४ तास दर्शनाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. राज्यातील दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री सहायता निधीस मदत देण्याबाबत सभेत चर्चा करून निर्णय घेण्यात आला.

## निवडक

### जीएसटी अधिकाऱ्यांचे अटक अधिकार रद्द करण्याचा निर्णय

**नवी दिल्ली :** जीएसटी परिषदेच्या ५७व्या बैठकीत ही प्रणाली अधिक सुलभ, जलद आणि स्वयंचलित करण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण प्रक्रियात्मक सुधारणेला चालना देण्यात आली. जीएसटी परिषदेने नोंदणी, विवरणपत्रे, परतावा, इनपुट टॅक्स क्रेडिट, व्यवसाय बंद करणे, मालाची वाहतूक आणि ई-कॉमर्स यांशी संबंधित नियमांमधील सुधारणांवर लक्ष केंद्रित केले. यातील सर्वात महत्त्वाचे म्हणजे अधिकाऱ्यांना असलेले अटक करण्याचे अधिकार रद्द करण्यात आले आहेत.

### राज्यातून मान्सूनची माघार; कमाल तापमानामध्ये वाढ

**मुंबई :** संपूर्ण राज्यातून मोसमी पावसाने माघार घेतल्याची घोषणा गुरुवारी (दि.८) हवामान विभागाने केली. यंदा हंगामात एकूण १९ टक्के इतकी पावसाची तूट आहे. दरम्यान, सध्या राज्यातील काही भागात कमाल तापमानात ३ ते ४ अंशांनी वाढ झाली असून ऑक्टोबरच्या पहिल्याच आठवड्यात नागरिकांना उन्हाचा त्रास सहन करावा लागत आहे.

## वाढवण बंदरबाधित मच्छीमारांच्या प्रश्नांवर शासन सकारात्मक!
### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार मंत्रालयात बैठक



**मुंबई : रामप्रहर वृत्त**

वाढवण बंदर प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या मच्छीमार आणि स्थानिक ग्रामस्थांच्या विविध प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार मंत्रालयात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव लोकेश चंद्रा यांच्यासोबत आमदार महेश बालदी यांनी या प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली.

### आमदार महेश बालदी यांची प्रधान सचिवांसोबत चर्चा

मच्छीमार आणि ग्रामस्थांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी शासन कटिबद्ध असून त्यांच्या मागण्यांवर सकारात्मक कार्यवाही करण्याचे आश्वासन यावेळी शासनाच्या वतीने देण्यात आले.

पालघर जिल्ह्याच्या किनारपट्टीवरील नागरिकांची उपजीविका प्रामुख्याने मासेमारी, शेती तसेच स्थानिक नैसर्गिक साधनसंपत्तीवर अवलंबून आहे. त्यामुळे वाढवण बंदराचा विकास करताना स्थानिक नागरिकांचे हक्क, उपजीविका, पर्यावरण आणि सुरक्षितता यांचे संरक्षण होणे अत्यावश्यक असल्याचे आमदार महेश बालदी यांनी बैठकीत स्पष्ट केले. स्थानिक मच्छीमारांचे होणारे कायमस्वरूपी आणि भरून न येणारे नुकसान लक्षात घेऊन त्यांना योग्य व न्याय्य मोबदला मिळण्यासाठी स्वतंत्र आणि सर्वसमावेशक धोरण निश्चित करण्याची मागणी करण्यात आली. या धोरणामध्ये मासेमारी व्यवसायाशी प्रत्यक्ष तसेच अप्रत्यक्षरीत्या संबंधित असलेल्या सर्व घटकांचा समावेश करण्यात यावा, अशीही भूमिका मांडण्यात आली. (पान २ वर..)

## महाड एमआयडीसीत वायूगळती, सहा कामगार जखमी

**महाड : प्रतिनिधी**



महाड औद्योगिक क्षेत्रातील अ‍ॅस्ट्रीड लाईफ सायन्सेस या कंपनीमध्ये गुरुवारी (दि.८) सायंकाळी रिऍक्टरमधील तापमानाचा दबाव वाढून झाकण उडाले आणि वायूगळती झाली. या दुर्घटनेमध्ये कारखान्यात काम करणारे सहा कामगार किरकोळ जखमी झाले आहेत.

महाड एमआयडीसी प्लॉट नंबर बी येथील अ‍ॅस्ट्रीड लाईफ सायन्सेस या कंपनीमध्ये सायंकाळी सातच्या सुमारास ही वायूगळती झाली. यावेळी रिऍक्टरमध्ये तापमानाचा दाब वाढून झाकण उडाले. त्यामुळे वायूगळती होऊन या ठिकाणी काम करणारे सहा कामगार जखमी झाले. जखमींमध्ये निलेश खारपाटील (रा. पेण), राजकिशोर सिंग (वय ५६, रा. बिरवाडी, महाड), नरेंद्र गोलांबडे (३०, रा. शिरगाव), तुकाराम पालकर (४२), अरुण कालगुडे (३६), हेमंत गेवाडे (३४) यांचा समावेश आहे. जखमींना महाडमधील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

घटनास्थळी तहसीलदार महेश शितोळे, औद्योगिक पोलीस ठाण्याचे अधिकारी, कर्मचारी यांनी भेट दिली. अधिक तपास सुरू आहे.



पनवेल : भाजपचे प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांचा चिरंजीव अपूर्व याला वाढदिवसानिमित्त आजोबा माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. (अधिक छायाचित्रे पान ३ वर..)

## विकसित भारत संकल्प यात्रा अंतर्गत रील स्पर्धा

### २५ हजारांचे रोख पारितोषिक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारताच्या संकल्पनेला महाराष्ट्राच्या गतिमान विकासाची जोड देत विकसित भारत संकल्प यात्रा अंतर्गत इन्फ्लुएन्सर रील स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. तरुणाईच्या सर्जनशीलतेला व्यासपीठ देतानाच नवी मुंबई व परिसरातील सुरू असलेल्या विविध विकासप्रकल्पांची माहिती प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहचविण्याचा या स्पर्धेचा उद्देश आहे.

या स्पर्धेसाठी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, अटल सेतू, पनवेल-कर्जत नवीन दुहेरी रेल्वे मार्ग, नेरूळ-बेलापूर-उरण नवीन रेल्वे मार्ग, नवी मुंबई मेट्रो विस्तार (विरार-अलिबाग मल्टी-मॉडेल कॉरिडॉर), बदलापूर-कळंबोली (पनवेल) जोडरस्ता व उन्नत मार्ग, जेएनपीटी बंदर विस्तार व एसईझेड तसेच करंजा बंदर प्रकल्प हे विषय देण्यात आले आहेत.

स्पर्धेतील रीलची कमाल कालमर्यादा ६० सेकंद असून रील फॉरमॅटमध्येच ती तयार करणे आवश्यक आहे. स्पर्धकांना मराठी, इंग्रजी किंवा हिंदी भाषेत रील सादर करता येईल. नावनोंदणीची अंतिम तारीख १३ ऑक्टोबर असून ही स्पर्धा उत्तर रायगड जिल्ह्यातील स्पर्धकांसाठी मर्यादित आहे. स्पर्धेतील विजेत्याला २५ हजारांचे रोख पारितोषिक देण्यात येणार असून इतर विजेत्यांसाठीही आकर्षक पारितोषिके व सन्मानचिन्हे देण्यात येणार आहेत. त्यामुळे तरुणाईने आपल्या कल्पकतेला आणि कलागुणांना वाव देत या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. अधिक माहिती व नावनोंदणीसाठी ८७६७१४९२०३, ९०२९५८०३४३ या क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



# सर्व समाजातील विद्यार्थ्यांसाठी एकत्रित वसतिगृहांची संकल्पना -मंत्री बावनकुळे

**मुंबई : प्रतिनिधी**

आदिवासी, अनुसूचित जाती-जमाती, इतर मागासवर्गीय, मराठा तसेच सर्व समाजातील विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वसतिगृहांऐवजी भविष्यात एकाच ठिकाणी सर्व समाजातील विद्यार्थ्यांना सुविधा उपलब्ध करून देणारी एकत्रित वसतिगृहांची संकल्पना राबविण्यात येणार आहे. त्यानुसार विभागीय स्तरावर सुमारे १ हजार विद्यार्थी क्षमतेचे, तर जिल्हास्तरावर ५०० विद्यार्थी क्षमतेचे वसतिगृह उभारण्याचे नियोजन करण्यात येत आहे.



या वसतिगृहांसाठी योग्य व सोयीस्कर शासकीय जागा निश्चित करून त्यांचे प्रस्ताव १३ ऑक्टोबरपर्यंत पाठवावेत, असे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिले. इतर मागासवर्ग बहुजन कल्याण विभागाच्या वसतिगृहांसाठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत मंत्रालयात झालेल्या बैठकीत ते बोलत होते.

या बैठकीस आमदार राणा जगजितसिंह पाटील, आमदार संजय बनसोडे, महसूल विभागाचे सहसचिव सं.द.सूर्यवंशी, सहसचिव मनीषा जायभाये, उपसचिव गौरी म्हस्के, उपसचिव भगवान सावंत, इतर मागासवर्ग बहुजन कल्याण विभागाच्या सहसंचालक स्नेहा देवकाते उपस्थित होते. तसेच राज्यातील सर्व जिल्हाधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले, वसतिगृहाची जागा निश्चित करताना केवळ उपलब्ध जागा पाहू नये, तर विद्यार्थी म्हणून त्या ठिकाणाचा विचार करावा. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी, ये-जा करण्यासाठी आणि दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी सोयीची जागा असावी. परिसरातील पायाभूत सुविधा, वाहतूक व्यवस्था आणि भविष्यातील विस्ताराची शक्यता लक्षात घेऊन जागा निश्चित करावी.

राज्यात यापूर्वी विविध समाजघटकांसाठी स्वतंत्र वसतिगृहांची व्यवस्था करण्यात आली आहे. मात्र, पुढील काळात उभारण्यात येणाऱ्या वसतिगृहांमध्ये सर्व समाजातील विद्यार्थ्यांना एकत्रितपणे निवासाची सुविधा उपलब्ध करून देण्याची संकल्पना राबविण्यात येणार आहे. सामाजिक समरसतेला चालना देतानाच विद्यार्थ्यांना दर्जेदार पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे हा या संकल्पनेचा उद्देश असल्याचे महसूलमंत्री बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

महाज्योतीमार्फत वसतिगृहांसाठी मागणी करण्यात आलेल्या जागांबाबत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने कार्यवाही करावी. चंद्रपूर, बीड, परभणी, धाराशिव, नांदेड, सांगली, सोलापूर, अकोला, यवतमाळ, गोंदिया आणि वाशिम या जिल्ह्यांतील जागांबाबत आवश्यक कार्यवाही करून प्रस्ताव शासनाकडे पाठवावेत,असे महसूल मंत्री बावनकुळे यांनी सांगितले.

काही ठिकाणी जागा उपलब्ध करून देण्याबाबत शासनस्तरावर निर्णय झालेला असतानाही संबंधित जागांचे प्रॉपर्टी कार्ड अद्याप पूर्ण झालेले नसल्याने पुढील कार्यवाही प्रलंबित आहे. संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी प्रॉपर्टी कार्डची कार्यवाही पूर्ण करून आवश्यक कागदपत्रांसह प्रस्ताव शासनाकडे सादर करावेत, अशा सूचना देण्यात आल्या.

वसतिगृहांसाठी जागा सुचविताना विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून विचार करण्याचे आवाहन मंत्री बावनकुळे यांनी केले. वसतिगृहाची जागा शैक्षणिक संस्था, सार्वजनिक वाहतूक, आरोग्य सुविधा, बाजारपेठ आणि इतर आवश्यक सुविधांच्या दृष्टीने सोयीची असावी. तसेच भविष्यातील वाढ लक्षात घेऊन आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करण्यास पुरेशी जागा उपलब्ध असावी, याचा विचार जिल्हाधिकाऱ्यांनी करावा, असे त्यांनी सांगितले.

महाज्योतीच्या जागांसाठी जिल्हाधिकाऱ्यांनी किमान १ हजार विद्यार्थ्यांच्या क्षमतेचे वसतिगृह उभारता येईल, अशा स्वरूपाचे प्रस्ताव तयार करावेत. उपलब्ध जागा, तिचे क्षेत्रफळ, स्थान, दळणवळणाची सुविधा, परिसरातील शैक्षणिक व नागरी सुविधा आणि भविष्यातील विस्ताराची शक्यता यांचा सविस्तर विचार करून प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या. जिल्ह्यांकडून प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांच्या आधारे सर्व समाजातील विद्यार्थ्यांसाठी एकत्रित वसतिगृह योजनेचा शासनस्तरीय आराखडा तयार करण्यात येणार असल्याचे महसूल मंत्री बावनकुळे यांनी सांगितले.

# लिफ्ट बंद असल्याच्या कारणावरून केला चाकूने हल्ला, दोघे अटकेत

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

जुना वाद आणि इमारतीची लिफ्ट बंद असल्याच्या कारणावरून आरोपीने वैभव रामचंद्र पाटील यांच्यावर चाकूने हल्ला करून त्यांना गंभीर जखमी केल्याचा प्रकार आदई येथे घडला. या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात विश्वास भास्कर जाधव आणि ऋषिकेश सुरेश सातपुते (दोघेही रा. अष्टविनायक गृहसंकुल, आदई गाव) यांच्या विरोधात ७ ऑक्टोबर रोजी हत्येचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. खांदेश्वर पोलिसांनी दोघांनाही अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार ६ ऑक्टोबर रोजी रात्री अकराच्या सुमारास फिर्यादी वैभव पाटील यांच्यासोबत मागील वादाच्या रागातून आणि इमारतीची लिफ्ट बंद असल्याच्या कारणावरून आरोपी यांनी संगनमत करून त्यांना फोन करून इमारतीच्या लिफ्टजवळ बोलावून घेतले. यावेळी फिर्यादी वैभव पाटीलला शिवीगाळ करण्यात आली. तसेच वैभव पाटील यांच्यावर आरोपीने गळ्यावर, छातीवर, पोटावर आणि पाठीवर धारदार चाकूने वार केले. यात वैभव पाटील हे गंभीर जखमी झाले.

या प्रकाराची माहिती खांदेश्वर पोलिसांना देण्यात आली. खांदेश्वर पोलिसांनी आरोपींविरोधात हत्येचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला आणि आरोपींना ७ ऑक्टोबर रोजी अटक केली. आरोपीकडून पोलिसांनी चाकू जप्त केला आहे. न्यायालयाने त्यांना ९ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

# तळोजा मध्यवर्ती कारागृहातील अंगझडतीत गांजा जप्त

**पनवेल : वार्ताहर**

जबरी चोरीच्या गुन्ह्यात अटक करण्यात आलेल्या आरोपीने तळोजा मध्यवर्ती कारागृहात प्रवेश करताना पार्श्वभागात गांजा लपवून नेण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. कारागृहात प्रवेश करण्यापूर्वी घेण्यात आलेल्या अंगझडतीदरम्यान आरोपीकडून सुमारे पाच ग्रॅम गांजा तसेच तो लपविण्यासाठी वापरण्यात आलेले काळ्या रंगाच्या सेलो टेपचे तुकडे जप्त करण्यात आले.

सेहेद मोहम्मद सुधु शाह ऊर्फ सज्जु (वय २६) असे आरोपीचे नाव आहे. तो मूळचा दक्षिण दिल्ली येथील असून सध्या नेरळ, कर्जत येथे वास्तव्यास आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार ४ ऑक्टोबर रोजी कळंबोली पोलिसांनी सेहेद मोहम्मद याला जबरी चोरीच्या गुन्ह्यात अटक केली होती. त्यानंतर न्यायालयाने त्याला न्यायालयीन कोठडी सुनावली. त्यानुसार ५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी सुमारे ५.१५ वाजता त्याला तळोजा मध्यवर्ती कारागृहात दाखल करण्यासाठी आणण्यात आले.

कारागृहात प्रवेश करण्यापूर्वी नियमानुसार कैद्यांची अंगझडती घेण्यात येत होती. त्यावेळी कारागृह हवालदार ज्ञानेश्वर सूर्यवंशी आणि त्यांच्या सहकाऱ्यांना आरोपीच्या हालचाली संशयास्पद वाटल्या. त्यामुळे त्याची कसून तपासणी करण्यात आली. या तपासणीत आरोपीने पार्श्वभागात लपवून आणलेला सुमारे पाच ग्रॅम गांजा आढळून आला तसेच गांजा लपविण्यासाठी वापरण्यात आलेले काळ्या रंगाच्या सेलो टेपचे सुमारे तीन ग्रॅम वजनाचे तुकडेही जप्त करण्यात आले.

कारागृह प्रशासनाच्या सुरक्षा व्यवस्थेला चकवा देत अमली पदार्थ कारागृहात नेण्याचा आरोपीचा प्रयत्न अंगझडतीमुळे उधळून लावण्यात आला. या प्रकरणी कारागृह प्रशासनाने आरोपी सेहेद मोहम्मद सुधु शाह ऊर्फ सज्जु याच्याविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून या प्रकरणाचा तपास सुरू आहे.

# पनवेलमधील जय भारत नाक्यावरील इमारतीवर पालिकेची तोडक कारवाई

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका प्रभाग समिती ड अंतर्गत जय भारत नाका पनवेल येथील भूखंड क्र ५००/१/२ याठिकाणची जी +१ मजली लाकडी लोडबेरिंग इमारत ही रस्ता रुंदीकरणामध्ये निष्कासित करण्यात आली.



या कारवाईवेळी आयुक्त महोदय मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त महेश कुमार मेघमाळे, सहायक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी श्रीमती डॉ.रूपाली माने व प्रभाग अधिक्षक राजेश डोंगरे तसेच शहर पोलीस स्टेशनचे पोलीस पथक, अतिक्रमण पथक, प्रभाग कार्यालयातील कर्मचारी, रायगड सुरक्षा रक्षक व एम एस एफ सुरक्षा रक्षक यांच्या मार्फत सदर ठिकाणी निष्कषणाची कारवाई करण्यात आली.

पनवेलमधील जय भारत नाक्यावरील वाहतूकीस अडथळा करणारी प्लॉट नंबर ५००/१/२ येथील इमारतीवर महापालिकेच्या वतीने जेसीबीच्या साह्याने मोठी तोडक कारवाई करुन इमारत जमीनदोस्त करण्यात आली. मोठ्या प्रमाणात अतिक्रमण विभागाचे मनुष्यबळ, जेसीबी, तीन डंपर पोखलँड यांच्या साहाय्याने ही कारवाई करण्यात आली.

## ट्रेलरच्या धडकेने दुचाकीस्वार महिलेचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

भरधाव ट्रेलरची दुचाकीला धडक बसून दुचाकीस्वार महिला ट्रेलरच्या चाकाखाली आल्याने तिचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना तळोजा फेज-१ येथील नावडे उड्डाणपुलावर घडली. या अपघातप्रकरणी तळोजा पोलिसांनी ट्रेलरचालकाविरोधात गुन्हा दाखल करून पुढील कारवाई सुरू केली आहे.

जास्मिन नावीद अंसारी (वय ४७) असे मृत महिलेचे नाव असून त्या मालाड येथील मालवणी परिसरात राहत होत्या. त्यांची बहीण तळोजा येथे राहत असल्याने जास्मिन या आपल्या बहिणीकडे आल्या होत्या. विशेष म्हणजे, त्यांनी अपघाताच्या अवघ्या आठ दिवसांपूर्वीच दुचाकी खरेदी केली होती.

मिळालेल्या माहितीनुसार, जास्मिन या आपल्या दुचाकीवरून तळोजा फेज-१ येथून पनवेलच्या दिशेने जात होत्या. सकाळी सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास नावडे येथील उड्डाणपुलावर त्यांच्या दुचाकीला भरधाव ट्रेलरने धडक दिली.

# जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त पनवेलमध्ये जनजागृती पदयात्रेचे आयोजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई आणि रायगड सायकियाट्रिक असोसिएशनतर्फे जागतिक मानसिक आरोग्य दिनाचे औचित्य साधून पनवेल येथे 'जनजागृती पदयात्रा' आयोजित करण्यात आली आहे. "चला, मानसिक आरोग्यासाठी पावलं टाकूया..." असा संदेश देत लोकांमध्ये मानसिक आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे हा या पदयात्रेचा मुख्य उद्देश आहे.

या वर्षीच्या पदयात्रेचा मुख्य संदेश 'खरे आवाज, वास्तविक बदल' असा ठेवण्यात आला आहे. या विशेष उपक्रमाला पनवेल विधानसभा क्षेत्राचे आमदार प्रशांत ठाकूर आणि पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. ही पदयात्रा शनिवार, १० ऑक्टोबर रोजी सकाळी ८ ते १० या वेळेत वडाळे तलाव, पनवेल येथून सुरू होईल. आयोजकांनी सर्व नागरिकांना या पदयात्रेत मोठ्या संख्येने सहभागी होऊन मानसिक आरोग्याविषयी जनजागृतीच्या या मोहिमेला हातभार लावण्याचे आवाहन केले आहे.

पान १ वरुन

## वाढवण बंदरबाधित मच्छीमारांच्या प्रश्नांवर शासन सकारात्मक!

मच्छीमारांसाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला 'गोल्डन स्पॉट' प्रस्तावित बंदर क्षेत्रात येत असल्याने बाधित मच्छीमारांच्या भविष्यातील उपजीविकेचा प्रश्न गंभीर आहे. त्यामुळे त्यांच्या उपजीविकेचे सातत्य कायम राहावे यासाठी सुरक्षित आणि पर्यायी मासेमारी क्षेत्र निश्चित करण्यात यावे, अशी मागणी बैठकीत करण्यात आली. स्थानिक मच्छीमारांच्या सोयी आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने धाकटी डहाणू येथे आधुनिक, सुसज्ज आणि सर्व आवश्यक सुविधांनी युक्त जेट्टी उभारण्यात यावी, अशीही मागणी करण्यात आली.

वाढवण बंदर प्रकल्पामुळे किनारपट्टीवरील काही गावे विस्थापित होण्याची भीती स्थानिक नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर गावांच्या विस्थापनाबाबत शासनाने स्पष्ट भूमिका जाहीर करून अधिकृत माहिती नागरिकांसमोर ठेवावी, अशी मागणी आमदार महेश बालदी यांनी केली. किनारपट्टीवरील गावांच्या भविष्यातील विकासाबरोबरच नागरिकांच्या मालमत्ता हक्कांचे संरक्षण होण्यासाठी संबंधित गावांचे अधिकृत आणि स्पष्ट सीमांकन करण्यात यावे, अशीही मागणी करण्यात आली.

वाढवण बंदर प्रकल्पामुळे होणाऱ्या संभाव्य पर्यावरणीय परिणामांचा गांभीर्याने विचार करून मोठ्या प्रमाणावर होणारी वृक्षतोड नियंत्रित करावी तसेच किनारपट्टी आणि स्थानिक पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी ठोस व प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी भूमिका बैठकीत मांडण्यात आली. वाढवण बंदराचा विकास हा स्थानिकांच्या हक्कांवर आणि उपजीविकेवर गदा आणणारा न ठरता त्यांच्या सहभागातून आणि हिताचे संरक्षण करून व्हावा. स्थानिकांचा विकासातील सहभाग, उपजीविकेचे संरक्षण, पर्यावरणीय समतोल आणि सुरक्षितता यांचा समतोल साधत बाधित गावांचा सर्वांगीण, सुरक्षित आणि शाश्वत विकास करण्यात यावा, अशी आग्रही मागणी यावेळी करण्यात आली.

या बैठकीस पालघरच्या जिल्हाधिकारी इंदुमती जाखड, जेएनपीटीचे चेअरमन गौरव दयाळ, पोलीस अधीक्षक यतीन देशमुख, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाचे मुख्याधिकारी प्रदीप पी., निवृत्त आयएएस अधिकारी राजू सिन्हा, भाजपचे प्रदेश सचिव संतोष जनाठे, युनियन अध्यक्ष तुषार धानमेहेर, सचिव दिनेश मर्दे, वाढवण बंदर समन्वयक कमलेश मराठे, बोटमालक प्रमुख महेश मर्दे, अमोल विंदे, वशिदास अंभिरे आदी उपस्थित होते.

# वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांना दंड

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यात वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी बुधवार (दि.७) वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण २३६ वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. पोलिसांनी या वाहनचालकांकडून २,३३,५००/-रुपये इतका दंड आकारला आहे. वाहतूक पोलिसांच्या या सुरू असलेल्या धडक कारवाईमुळे वाहनचालकांचे धाबे दणाणले आहेत.

# खारघरमध्ये 'रंग पाण्याचा' सांस्कृतिक मैफिल रंगली

**पनवेल : वार्ताहर**

कधी दवबिंदू, कधी ढग, कधी खळाळता झरा, कधी जीवनदायिनी नदी, तर कधी अथांग सागर... पाण्याच्या या विविध रूपांना कविता, गीत, गायन आणि तालाची सुरेल साथ लाभल्याने खारघरमध्ये 'रंग पाण्याचा' ही आगळीवेगळी सांस्कृतिक मैफिल रंगली. 'आनंदक्षण' या पाच सख्यांच्या समूहाने आयोजित केलेल्या या कार्यक्रमाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

पाण्याच्या प्रत्येक थेंबात एक वेगळी कथा, भावना आणि आठवण दडलेली असते. याच भावविश्वाचा धागा पकडत दवबिंदूपासून सागरापर्यंतचा भावप्रवास या मैफलीत उलगडण्यात आला. पाण्याकडे केवळ जीवनाचा आधार म्हणून न पाहता, त्याचे माणसाच्या संवेदना, निसर्गप्रेम आणि आठवणींशी असलेले नाते शब्द आणि स्वरांच्या माध्यमातून प्रभावीपणे मांडण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात 'आभाळमाया' या लोकप्रिय मालिकेच्या शीर्षकगीताने झाली. त्यानंतर बालकवी, मंगेश पाडगांवकर, संदीप खरे आणि सौमित्र यांच्या पाऊस व पाण्यावर आधारित कवितांनी मैफलीला साहित्यिक रंग चढवला. 'पाऊस आला...', 'अग्गोबाई ढगोबाई' यांसारख्या परिचित गीतांना रसिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.

दवबिंदूची नाजूकता, ढगांची आतुरता, झऱ्याचा खळाळता आनंद, नदीचा प्रवाही जीवनसूर आणि सागराची अथांगता अशा पाण्याच्या विविध भावछटा कविता आणि गीतांमधून रसिकांसमोर साकारल्या. त्यामुळे संपूर्ण मैफल पावसाळी आठवणी, निसर्ग आणि साहित्याच्या ओलाव्याने भारून गेली.

कार्यक्रमाचे ओघवते निवेदन जान्हवी खराळकर यांनी केले. प्रांजली कुळकर्णी यांच्या सुरेल गायनाने मैफलीला विशेष रंगत आणली. श्रेया प्रभुणे, डॉ. मीनल टेंभेकर आणि दीपाली लाभे यांनी कविता सादर करत पाण्याच्या विविध भावविश्वाला शब्दरूप दिले. नरेश रक्ताडे यांच्या तबल्याच्या सुरेख साथीने गीत-कवितांना लयबद्ध आधार मिळाला.

'रंग पाण्याचा' ही मैफिल केवळ गीत-कवितांचा कार्यक्रम न राहता, पाण्याच्या प्रत्येक थेंबामागील सौंदर्य, प्रत्येक लाटेमागील भावना आणि निसर्गाशी असलेले माणसाचे नाते नव्याने अनुभवून देणारा कलात्मक सोहळा ठरला. खारघरमधील साहित्य, संगीत आणि कलेची आवड असलेल्या रसिकांनी उपस्थित राहून कलाकारांना उत्स्फूर्त दाद दिली.

# नाना पाटेकर यांच्या आठवणींना मुरूडकरांकडून उजाळा...

**मुरुड : रामप्रहर वृत्त**





आजोळ असलेले ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांचे गुरुवारी निधन झाले. नाना पाटेकर यांचे बालपण मुरूडमध्ये गेले. त्यांचे प्राथमिक शिक्षणही मुरूडमध्ये नगरपालिकेच्या शाळा नंबर १ मध्ये झाले. नानांचे काही नातेवाईक, मित्र आजही मुरूडमध्ये आहेत. रायगडमध्ये आल्यावर मुरूडच्या पाटील खानावळीत जेवणाचा त्यांचा आग्रह असायचा. शिवाय मुरूडमधील बाळा साखरकर यांचा नातू नानांचा वर्गमित्र. नाना कधी मुरुडला आले तर त्यांच्या होडीतून ते समुद्रात फेरफटका मारत.

नाना पाटेकर यांचे मामेभाऊ श्रीकांत सुर्वे यांनीही त्यांच्या आठवणी सांगितल्या. नानांचे पहिली ते चौथीपर्यंतचे शिक्षण मुरुडमध्ये झालं. त्यांचे अनेक जिवलग मित्र मुरुड मध्ये होते. नाना कुटुंब वत्सल होते. ते आवर्जून कुटुंबातून माणसांची आस्थेने चौकशी करत असत.कुटुंबाची काळजी करणारा माणूस आमच्यातून गेला हे आमच्यासाठी अत्यंत दुःखदायक असल्याची भावना श्रीकांत सुर्वे यांनी व्यक्त केली. त्यांनी सांगितले की,मुरुडच्या पत्रकांसोबत ही नानाचे मैत्रीचे संबंध असल्याने २००६ साली नाना व पत्नी नीलकांती पाटेकर, मंगेश कुळकर्णी सुधीर नाझ रेआणि किरण बाथम शुटिंगचे लोकेशन पाहण्यासाठी बाळा साखरकर यांच्या बोटीतून पदमदुर्ग किल्ल्यात गेलो. जाताना नानाचे बोलणे परखड शिव्या देऊन बोलणे दुसऱ्याला राग आला तरी बोलण बदलणार नाही असे अनुभव किल्ल्यात जाताना आले. किल्ल्याच्या लोकेशनचे फोटो काढण्यासाठी मला नेले होते येताना नानाला फिशिंग करण्याचे हुकी आली. बाळा साखरकारनी जाळी काढली नानांनी उंच उडवून जाळी पाण्यात टाकली आणि काय योगायोग ३ फूट मासा लागला. नाना काय खुश झाला तो मासा घेऊन मुरुड किनारी उतरला आणि मासा खाद्यावर घेऊन बाजारतून चालत निघाला. कोळीवाड्यात लहान मुले नानाच्या मागे असा होता नाना.

नाना मारुती नाक्यावर आप्पा खातू यांच्या घरी राहायचा खरंतर नानाच्या बाबांनी नानाला मुंबईच्या खराब वातावरणांतून बाहेर काढण्यासाठी मुरुडला म्हणजे सुर्वे मामांकडे पाठवला. हनुमान नाक्यावरील सुधीर दांडेकर ,विभा दांडेकर असे अनेक जवळचे मित्र होते त्यांना भेटण्यासाठी नाना खास मुरुडला येत होते. नानाच्या लहानपणच्या आठवणीसाठी नानांनी मुरुड समुद्रकिनारी जागा घेतली होती. त्याला मुरुडला सुंदर घर बाधंण्याची इच्छा होती, पण काही कारणास्तव ती अधुरी राहिली. नानाचा मामेभाऊं श्रीनाथ हा नानाचा अतिशय जवळचा होता. नानाचे जाणे हे सर्वांसाठी दुःखदायक आहे.

## सेवा संकल्प अभियान २०२६ अंतर्गत कळंबोलीत उपक्रम

# महिलांसाठी विशेष आरोग्य शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या 'सेवा संकल्प अभियान २०२६' अंतर्गत महिला व बालकल्याण विभाग आणि वैद्यकीय आरोग्य विभागाच्या संयुक्त विद्यमाने लोकनेते प्रभाग अ अंतर्गत काळभैरव सभागृह कळंबोली येथे गुरुवरा दिनांक ०८ ऑक्टोबर रोजी विशेष आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले.




या शिबिराच्या उद्‌घाटन प्रसंगी उपमहापौर प्रमिला पाटील, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती ममता प्रितम म्हात्रे , प्रभाग समिती अ चे सभापती रविंद्र भगत, महापालिका सदस्य सरस्वती काथारा, मोनिका महानवर, योगिता फडके, मनाली ठाकूर, बायजा बारगजे, संधीवात तज्ज्ञ, मेंदू व मज्जासंस्था तज्ज्ञ उपस्थित होते. यावेळी महिला व बालकल्याण समितीच्या सभापती ममता प्रितम म्हात्रे यांनी उपस्थितांना या आरोग्य शिबीराविषयी माहिती दिली.तसेच मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

या शिबिरांमध्ये महिलांना विविध आरोग्यविषयक समस्यांवर मोफत तपासणी तसेच तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन मिळाले.या शिबिरांमध्ये सांधेदुखी, गुडघेदुखी, हात-पायांची सूज व मुंग्या येणे, नसांशी संबंधित त्रास तसेच मान, पाठ व कंबरदुखी अशा समस्यांवर मोफत तपासणी व तज्ज्ञ मार्गदर्शन मिळाले. तसेच उच्च रक्तदाब, मधुमेह, नेत्ररोग व दंतरोग तपासणी, स्तन, गर्भाशय मुख आणि मुख कर्करोग तपासणी, गरोदर महिलांसाठी प्रसूतीपूर्व तपासणी, लसीकरण सेवा, रक्त आणि हिमोग्लोबिन तपासणी, क्षयरोग (TB) तपासणी, मलेरिया, डेंग्यू, चिकनगुनिया आणि लेप्टोस्पायरोसिस तपासणी, सिकसेल आजार व रक्तक्षय (ॲनिमिया) तपासणी अशा विविध आरोग्य सेवा व तपासणी सेवा देण्यात आल्या. यावेळी सुमारे २०० लाभार्थ्यांनी लाभ केला.

आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या या आरोग्य तपासणी शिबिरास मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ आनंद गोसावी, क्षयरोग अधिकारी डॉ उषा राठोड, वैद्यकिय अधिकारी डॉ. रेहाना मुजावर, वैद्यकीय अधिकारी डॉ. मनिषा चांडक, डॉ. वैद्यकीय अधिकारी डॉ सुरेश पंडित, वैद्यकीय अधिकारी डॉ भक्तराज भोईटे, महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी व कर्मचारीही उपस्थित होते.

९ ऑक्टोबर रोजी प्रभाग क्र : प्रभाग समिती कार्यालय, कामोठे व १० ऑक्टोबर रोजी प्रभाग ब : ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र, सेक्टर १५, खारघर या ठिकाणी होणाऱ्या आरोग्य शिबिराचा जास्तीत जास्त महिलांनी लाभ घ्यावा असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

## कामोठ्यात अतिक्रमणविरोधी पथकाची मोठी कारवाई

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आयुक्त मंगेश चितळे यांच्या सुचनेनुसार पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते आणि फुटपाथ मोकळे ठेवण्यासाठी पालिका प्रशासनाने अतिक्रमण विरोधी मोहीम अधिक तीव्र केलीआहे.



दरम्यान , महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'क' कामोठे येथे अतिक्रमण विभागाच्या वतीने शहरातील अनधिकृत हातगाड्या, अनधिकृत फळे-भाजी विक्री व्यवसाय धारक, फुटपाथवरील अनधिकृत व्यवसाय धारक, अनधिकृत टपऱ्या यांच्यावर मोठी तोडक कारवाई करण्यात आली.

यावेळी अतिरिक्त आयुक्त महेश कुमार मेघमाळे, चारही प्रभागाचे अधिक्षक दशरथ भंडारी, अरविंद पाटील, जितेंद्र मढवी, राजेश डोंगरे, मनोज चव्हाण,अतिक्रमण विभाग प्रमुख अमर पाटील, चारही प्रभागाचे अतिक्रमण विभागाचे मनुष्यबळ उपस्थित होते.

कामोठे प्रभागातील अनधिकृतपणे चालणाऱ्या खाद्यपदार्थ विक्रेत्यांवर पालिका पथकाने कारवाईचा बडगा उभारला. तसेच रस्त्याच्या कडेला आणि दुकानांच्या बाहेरील मोकळ्या जागेत अनधिकृतपणे साहित्य ठेवून अतिक्रमण करणाऱ्या दुकानदारांचे सामान जप्त करण्यात आले.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील कामोठे प्रभागातील मुख्य रस्ते, शाळांचे परिसर आणि सार्वजनिक जागा अतिक्रमणमुक्त करण्यासाठी ही धडक मोहीम यापुढेही अशीच सुरू राहणार आहे.



**पनवेल : एज्युकेशन टु डे प्रस्तुत महाराष्ट्र मेरिट स्कूल यांच्याकडून सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूल सीबीएससीला इमर्जिंग स्कूल इन नवी मुंबई २०२६ अवॉर्ड मिळाला. त्याबद्दल स्कूलचे चेअरमन तथा नगरसेवक परेश ठाकूर यांच्याकडून मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर, शिक्षकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी वर्गाचे अभिनंदन करण्यात आले.**

## भागुबाई चांगू ठाकूर कॉलेज ऑफ लॉच्या विद्यार्थ्यांची मुंबई उच्च न्यायालयात शैक्षणिक भेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कायद्याचे शिक्षण केवळ पाठ्यपुस्तकांपुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांना न्यायव्यवस्थेच्या प्रत्यक्ष कार्यपद्धतीचा अनुभव मिळावा, या उद्देशाने भागुबाई चांगू ठाकूर कॉलेज ऑफ लॉ पनवेल येथील पाचवे वर्ष बी.ए. एलएल.बी.. आणि तृतीय वर्ष बी.ए. एलएल.बी..च्या विद्यार्थ्यांनी दि. २८ व २९ सप्टेंबर २०२६ रोजी मुंबई उच्च न्यायालयाला शैक्षणिक भेट दिली.




महाविद्यालयाच्या आदरणीय प्राचार्या डॉ. सानवी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आणि व्यावहारिक प्रशिक्षण ३ या विषयाच्या अनुषंगाने आयोजित करण्यात आलेल्या या भेटीमुळे विद्यार्थ्यांना कायद्याच्या सैद्धांतिक अभ्यासासोबतच न्यायालयीन व्यवस्थेचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची अनोखी संधी मिळाली.

या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी मुंबई उच्च न्यायालयातील विविध न्यायालयीन कक्ष, संग्रहालय आणि न्यायाधीशांचे ग्रंथालय यांना भेट दिली. न्यायालयीन वातावरणाचे निरीक्षण करताना विद्यार्थ्यांना न्यायालयीन कामकाजाची रचना, न्यायालयीन शिस्त, कायदेविषयक संदर्भ साहित्य आणि न्यायव्यवस्थेच्या विविध पैलूंची प्रत्यक्ष माहिती मिळाली.

पुस्तकातील कायदा प्रत्यक्ष न्यायालयीन प्रक्रियेत कसा कार्यरत होतो, याची अनुभूती विद्यार्थ्यांना या भेटीतून मिळाली. त्यामुळे ही शैक्षणिक भेट विद्यार्थ्यांच्या कायदेविषयक ज्ञानाला व्यावहारिक दृष्टिकोन देणारी आणि त्यांच्या भविष्यातील कायदेविषयक कारकिर्दीसाठी मार्गदर्शक ठरली.विद्यार्थ्यांनी या भेटीबद्दल उत्स्फूर्त प्रतिक्रिया व्यक्त करताना मुंबई उच्च न्यायालयातील न्यायालयीन वातावरणाचा प्रत्यक्ष अनुभव हा त्यांच्या शैक्षणिक प्रवासातील महत्त्वपूर्ण अनुभव असल्याचे नमूद केले.

## नगरसेवक परेश ठाकूर यांची महाराष्ट्र बॅडमिंटन असोसिएशनच्या उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल अभिनंदन



**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूल, उलवेचे चेअरमन व पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते तथा नगरसेवक परेश ठाकूर यांची महाराष्ट्र बॅडमिंटन असोसिएशनच्या उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीवर्गाच्या वतीने त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले.

परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली सामाजिक, शैक्षणिक तसेच क्रीडा क्षेत्राला सातत्याने प्रोत्साहन मिळत आहे. महाराष्ट्र बॅडमिंटन असोसिएशनच्या उपाध्यक्षपदी झालेली त्यांची निवड ही त्यांच्या कार्याची व क्रीडा क्षेत्रातील योगदानाची दखल मानली जात आहे.या निवडीबद्दल सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीवर्गाने त्यांची भेट घेऊन पुष्पगुच्छ देत अभिनंदन केले. तसेच त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

शाळेतील विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रात प्रोत्साहन मिळावे, त्यांच्यामध्ये क्रीडाभावना व नेतृत्वगुण विकसित व्हावेत, यासाठी त्यांच्या मार्गदर्शनाचा निश्चितच लाभ होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.













**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना प्रतिष्ठेच्या शरदरत्न जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याबद्दल महापालिका माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, पंचायत समिती सदस्य राजेंद्र पाटील, मनपा महिला व बालकल्याण समिती सभापती ममता म्हात्रे, नगरसेविका सरस्वती कातारा, नगरसेवक गणेश कडू ,सरपंच मंगेश शेलार, पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, कर्णा शेलार, वसंत पाटील, निलेश पाटील, गणेश पाटील, सुनील बहिरा, युवानेते मयूर शेळके यांनी त्यांचे अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.**




**पनवेल : आमदार प्रशांत ठाकूर यांचे चिरंजीव अपूर्व ठाकूर याचा वाढदिवस गुरुवारी साजरा झाला. याबद्दल अपूर्वला आजी शकुंतला ठाकूर, महापालिका माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, महिला व बालकल्याण समिती सभापती ममता म्हात्रे, नगरसेविका सरस्वती कातारा, नगरसेवक गणेश कडू माजी नगरसेवक गणेश पाटील, सुनील बहिरा, युवा नेते मयूर शेळके, आदित्य ठाकूर आदींनी वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.**

## संपादकीय

# समोर फक्त नकारात्मकता!

देशात आज एका बाजूला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा भविष्यावर लक्ष्य ठेवून केलेला दिवस-रात्र काम करण्याचा निर्धार आहे. तर दुसरीकडे, प्रत्येक पावलावर अडथळा आणि संशय निर्माण करण्याची विरोधकांची नकारात्मक राजकीय प्रवृत्ती. जागतिक अस्थिरतेच्या सध्याच्या कालखंडात भारतीय जनतेला निश्चितपणे आज गरज आहे ती 'आपण करू शकतो' या आत्मविश्वासाचीच. 'हे होणारच नाही' ही नकारात्मक मानसिकता यावेळी काय कामाची.

**भारत विकसित होईपर्यंत मी थांबणार नाही, थकणार नाही किंवा मार्गापासून विचलित होणार नाही, हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा निर्धार केवळ स्वतःपुरता मर्यादित नाही. २०४७पर्यंत विकसित भारत, आत्मनिर्भर भारत, अवकाश क्षेत्रातील मोठी झेप, जागतिक पातळीवरील भारताची प्रतिष्ठा आणि देशाच्या सामर्थ्याला अनुरूप स्थान मिळवून देण्याचा तो संकल्प आहे. आणि त्यांच्या या संकल्पातून भारताच्या उज्ज्वल भवितव्यावरील त्यांची प्रगाढ श्रद्धा आणि त्यांचा दुर्दम्य आत्मविश्वास लख्ख दिसतो. न थकणारी कार्यक्षमता आणि संकटांकडे आव्हान म्हणून पाहण्याची वृत्ती हे कायमच मोदींच्या राजकीय व्यक्तिमत्त्वातील सर्वात ठळक वैशिष्ट्य राहिले आहे. गेली पंचवीस वर्षे आत्यंतिक खंबीरपणे व दूरदृष्टीने नेतृत्वस्थानी राहणे ही केवळ प्रदीर्घ राजकीय कारकीर्द नाही तर यातून सातत्य, संयम, संघर्ष आणि अखंड परिश्रमाची कसोटीच दिसते. नरेंद्र मोदी यांनी आधी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून आणि नंतर देशाचे पंतप्रधान म्हणून सलग पंचवीस वर्षे शासनाची जबाबदारी सांभाळली आहे. त्यामुळेच सध्याच्या वैशिष्ट्यपूर्ण जागतिक पार्श्वभूमीवर मोदींचा 'वी विल डू इट' अर्थात 'आपण करूनच दाखवू' हा मंत्र जनतेला अर्थपूर्ण व दिलासादायक वाटून गेला. आपल्या पंचवीस वर्षांच्या प्रवासाचे श्रेयही मोदींनी जनतेच्या याच विश्वासाला तसेच कार्यकर्त्यांना आणि संघटनेला दिले आहे. विरोधकांच्या टीकेकडेही त्यांनी नेहमीच शिकवण म्हणून पाहिले आहे. ज्यांनी विरोध केला, त्यांनी लोकशाहीची ताकद शिकवली, हा त्यांचा दृष्टिकोन त्यांचा राजकीय आत्मविश्वासच अधोरेखित करतो. टीकेला उत्तर देण्यापेक्षा कामातून उत्तर देणे, हेच त्यांचे धोरण राहिले आहे. त्यामुळेच सध्या देशाच्या राजकारणात दुसऱ्या बाजूला दिसणाऱ्या चित्रातील नकारात्मकता अधिकच खटकते. मोदी 'वी विल डू इट' म्हणत २०४७चे लक्ष्य डोळ्यासमोर ठेवत असताना इंडी आघाडी मात्र निवडणूक आयोगाच्या एसआयआर प्रक्रियेविरोधात आंदोलन, मोर्चे आणि राजकीय संघर्षाचा मार्ग स्वीकारत आहे. आयोगाच्या कार्यालयाकडे या आघाडीने काढलेल्या मोर्चात घोषणाबाजी, अडथळे आणि नंतरचे धरणे यामुळे प्रश्नाच्या संस्थात्मक चर्चेपेक्षा संघर्षाचे राजकारणच अधिक ठळक झाले. लोकशाहीत प्रश्न विचारण्याचा आणि निवडणूक आयोगावर टीका करण्याचाही विरोधकांना पूर्ण अधिकार आहे. परंतु प्रत्येक प्रशासकीय प्रक्रियेला संशयाच्या भोवऱ्यात ढकलणे आणि घटनात्मक संस्थांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणे ही लोकशाही मजबूत करण्याची पद्धत कदापि नव्हे. मतदारयादी शुद्ध करण्याची प्रक्रिया विरोधकांना चुकीची वाटत असेल तर पुरावे सादर करणे, कायदेशीर मार्ग स्वीकारणे आणि आयोगाशी संस्थात्मक संवाद साधणे अधिक जबाबदार ठरले असते. रस्त्यावरचा संघर्ष हा लोकशाहीतील एकमेव पर्याय असू शकत नाही. दुसरीकडे पंचवीस वर्षांचा टप्पा गाठूनही मोदींनी विश्रांतीची भाषा केली नाही. उलट, पुढील ध्येय आणखी मोठे केले. संकल्प मोठा असेल, मेहनत अखंड असेल आणि राष्ट्रहित सर्वोच्च असेल तर भारताचे भविष्यही मोठेच असेल. आणि आपण ते करूनच दाखवू!**

# पर्यटकांचा अतिउत्साह ठरतोय जीवघेणा!

**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**



पुणे जिल्ह्यातील आळंदी येथी विनर्स अकादमीच्या आठ विद्यर्थ्यांचा दिवेआगर येथील समद्रात बुडून मृत्यू झाला. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्र हळहळला. या घटनेमुळे समुद्रकिनाऱ्यांवर पर्यटकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. आता यावर चर्चा होईल, जिल्हा प्रशासन आाणि पोलिसांवर टीका केली जाईल, मात्र या दुर्घटनेसाठी केवळ प्रशासनाच्या हलगर्जीपणाला दोष देऊन चालणर नाही. जे लोक सहल घेऊन येतात त्यांचीदेखील काही जबाबदारी होती व ती त्यांनी निभावली पाहिजे. बहुतांश वेळा आशा दुर्घटनांना पर्यटकांचा अतिउत्साह कारणीभूत ठरतो. पर्यटकांचा हा अतिउत्साह त्यांच्या जीवार बेततो.

अलिबाग येथील कुलाबा किल्ला पाहून परतताना दुर्घटना घडायच्या, परंतु नगर परिषदेने काही सुविधा दिल्यामुळे येथील दुर्घटना कमी झाल्या आहेत. मागील काही वर्षापासून या किनाऱ्यावर जीवन रक्षक तैनात करण्यात आले आहेत तसेच समुद्रस्नान करण्यासाठी ठरावीक अंतराच्या मर्यादा घालून देण्यात आल्या आहेत. सूचना फलक लावण्यात आले आहेत. भरती सुरू झाल्यावर भोंगा वाजतो. त्यामुळे अलिबाग समुद्रात पर्यटकांचे बडण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर घटल आहे. अशी व्यवस्था इतर काही समुद्र किनाऱ्यांवर नाही. पर्यटकांच्या सुरक्षेच्या या सुविधा सर्वच समुद्र किनाऱ्यांवर असल्याच पाहिजेत.

कोकणाच्या बहेरून येणाऱ्या पर्यटकांना समुद्राचे जास्त आर्षण असते. पाणी पाहिल्यानंतर त्यांचा उत्सह वाढतो. उत्साहाच्या भरात ते पाण्यात जातात, परंतु त्यांना भरती-ओहोटीची माहिती नसते. अचानक पाणी वाढते किंवा कमी होते. पाण्याचा अंदाज येत नाही. आणि दुर्घटना घडते.

आळंदी येथून खासगी कोचिंग क्लासेसची सहल दिवेआगर येथे आली होती. यात ४८ जणांचा समावेश होता. दिवेआगर समुद्र किनाऱ्यावर दुपारी यातील काही विद्यार्थी समुद्रात स्नानासाठी उतरले, मात्र पाण्याचा प्रवाह आणि खोलीचा अंदाज न आल्याने यातील आठ विद्यार्थी बुडाले, स्थानिकांनी त्यांचा शोध घेऊन सर्वांना बाहेर काढले दुर्दैवाने तोवर सर्व आठही विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला होता. आठ तरुण मुलांचा जीव गेला. पाण्याचा अंदाज न आल्यामुळे या मुलांचा बुडून मृत्यू झाला.



२०१६ साली पुण्यातील अबिदा इनामदार महाविद्यालयातील सहलीसाठी आलेल्या १४ विद्यार्थ्यांचा मुरूड येथील समुद्रात बुडून मृत्यू झाला. एकदरा खाडीच्या मुखाकडे ही मुले होती. खाडीच्या मुखाकडे पाण्याचा प्रवाह जोरात असतो याची माहिती या मुलांना आणि त्यांच्यासोबत आलेल्या शिक्षकांना नव्हती. त्यामुळे ते तेथे गेले. पाण्यात जाऊ नका असे स्थानिक घोडवाल्यांनी सांगितले असतानादेखील ही मुले पाण्यात गेली होती.

यातून सर्वांनीच काहीतरी शिकले पाहिजे. आपल्याला पाण्याचा अंदाज नसताना खोल पाण्यात जाण्याचे टाळले पाहिजे. स्थानिक लोक सांगतात तेव्हा त्यांचे ऐकले पहिजे. केवळ जिल्हा प्रशासन आणि पोलिसांना दोष देण्यात काहीच अर्थ नाही. पर्यटकांनीदेखील पर्यटनाचा आनंद घेताना अतिउत्साह टाळला पाहिजे. सुरक्षेच्या सुविधा नसल्यामुळे अपघात घडतात हे खरे असले तरी पर्यटकांनीदेखील स्वतःला आवरले पाहिजे. दिवेआगर समुद्र किनाऱ्यावर आठ विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू झाल्यामुळे समुद्र किनाऱ्यावर पर्यटकांच्या सुरक्षेतील त्रुटी पुन्हा समोर आल्या आहेत.

दिवेआगर समुद्र किनाऱ्यावर पर्यटकांच्या सुरक्षेसाठी जीवरक्षक उपलब्ध नसल्याची तसेच किनारपट्टीवर बचाव उपकरणांचा अभाव असल्याची बाब समोर आली आहे. दिवेआगर समुद्र किनाऱ्यावरील पर्यटकांच्या सरक्षिततेचा मुद्दा साोर आला आहे. ही दर्घटना घडली तेव्हा तेथे धोक्याची सूचना देणारी कुठलीही यंत्रणा अस्तित्वात नव्हती. बचाव कार्यासाठी उपलब्ध साधनेही त्या ठिकाणी उपलब्ध नव्हती. रिंग बोया, रोबोटीक बोया, लाईफ जॅकेट, दोरी यासारखी साधनेही उपलब्ध नव्हती. त्यामुळे समुद्रात बुडणाऱ्या विद्यार्थ्यांना वेळेवर मदत मिळू शकली नाही.

मागील काही वर्षांपासून रायगडातील समुद्र किनाऱ्यांवर पर्यटनासाठी येणाऱ्यांची संख्या वाढली आहे. किनाऱ्यांना दरवर्षी सरासरी पाच ते रायगड जिल्ह्यातील समुद्र सहा लाख पर्यटक भेट देत असतात, परंतु त्यांच्या सुरक्षेसाठी किनाऱ्यांवर तितक्याशा सुविधा नाहीत. यातील बहुतांश पर्यटकांना समुद्रातील पाणी आणि भरती-ओहोटीच्या प्रवाहांचा अंदाज नसतो.

समुद्रात येणाऱ्या भरती-ओहोटीचा अंदाज न आल्यामुळे बहुतांश दुर्घटना होत असतात. गोव्याच्या धर्तीवर कोकणातील समुद्र किनाऱ्यांवर सुरक्षा व्यवस्था करणे गरजेच आहे. सर्व किनाऱ्यांवर पर्यटकांच्या सुरक्षेसाठी सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. हे शक्य नसेल तर किमान जेथे पर्यटक जास्त येतात अशा किनाऱ्यांवर भरती-आहोटीच्या सूचना देणारी यंत्रणा बसवली पहिजे. जीवन रक्षकांची नेमणूक करायाला हवी. त्याचबरोबर पर्यटकांना समुद्रस्नानासाठी ठराविक अंतराची मर्यादा घालून तेथे जाळ्या लावणे आश्यक आहे. पर्यटकांनीदेखील उत्साहाला आवरले पाहिजे. स्थानिकांनी दिलेल्या सूचनांचे पालन केले पाहिजे. अतिउत्साह जीवघेणा ठरतो याचे भान ठेवले पाहिजे. मग दुर्घटना टळू शकतात.

## बदलते तंत्रज्ञान

# वायफायचा स्पीड स्लो झालाय? मिळवा फास्ट इंटरनेट

कधी कधी दिवसभर मोबाईलचे नेट अपुरे पडते. चित्रपट, वेब सीरिज, मालिका किंवा जास्त एमबीचे पीडीएफ डाउनलोड करण्यासाठी मोबाईलचे नेट अपुरेच पडते. त्यामुळे आपल्यातील बरेच जण घरी वायफाय लावून घेतात. वायफाय वेगवान आणि अधिक विश्वासार्ह सुविधा असली तरी काही वेळा अचानक लाईट जाणे, नेट न चालणे आदी अनेक समस्यांना आपल्या सगळ्यांनाच तोंड द्यावे लागते. मग यामुळे काम थांबते आणि मूडसुद्धा खराब होतो. तर या समस्या सोडविण्यासाठी पुढील उपाय...



राउटरची योग्य जागा निवडा – तुम्ही घरी किंवा ऑफिसमध्ये तुमचा राउटर कुठे ठेवता, हे महत्त्वाचे आहे. भिंतींनी झाकलेल्या जागा किंवा कोपऱ्यांमध्ये राउटर बसवणे टाळावे. तुमचा राउटर नेहमी हॉलसारख्या मोकळ्या जागेत किंवा ऑफिसच्या मध्यभागी असणाऱ्या भिंतीवर ठेवा; जेणेकरून सर्व ठिकाणी (घर किंवा ऑफिसमध्ये) सिग्नलचे वितरण योग्य प्रकारे होईल.

डिव्हायसेसची संख्या मर्यादित करा – जेव्हा तुम्ही तुमच्या वायफायशी अनेक डिव्हाइस कनेक्ट करता, तेव्हा स्वाभाविकपणे त्याचा स्पीड कमी होऊन जातो. त्यामुळे कनेक्ट केलेल्या डिव्हायसेसची संख्या कमी करणे सोईचे ठरेल. कनेक्शन मर्यादा सेट करण्यासाठी तुम्हाला राउटरची सेटिंग्ज तपासावी लागेल आणि नको असलेले डिव्हाइस किंवा कोणी वायफाय वापरत नसल्यास ते डिव्हाइस डिस्कनेक्ट करा.

राउटर रीस्टार्ट करा – जर तुम्ही राउटर दिवसभर चालू ठेवत असाल, तर ती एक मोठी समस्या आहे. त्यामुळे तुमच्या इंटरनेटचा वेग कमी होऊ शकतो. अशी समस्या जाणवल्यावर वायफाय रीस्टार्ट करा. काही मिनिटांसाठी राउटर बंद करा आणि नंतर तो पुन्हा चालू करा.

गरजेनुसार राउटर रीसेट करा – तुमचा राउटर एकापेक्षा जास्त वेळा किंवा विनाकारण रीस्टार्ट करण्यात काहीच नुकसान नाही. कारण वायफायच्या सतत वापरामुळे अनेक समस्या निर्माण होऊ शकतात. राउटर रिस्टोअर करण्यासाठी रिसेट बटण वापरा, जे तुमच्या राउटरच्या मागील बाजूस डीफॉल्ट सेटिंग्जमध्ये असेल.

राउटर अपग्रेड करा – हाय स्पीड कनेक्शन हाताळण्यासाठी चांगल्या क्षमतेसह नवीन मॉडेलमध्ये राउटर अपग्रेड करा.

# संगीत रचनाकार, गायकनट गोविंदराव टेंबे



**निमित्त**

प्रख्यात हार्मोनियमवादक, संगीतरचनाकार, गायकनट व साहित्यिक गोविंदराव सदाशिवराव टेंबे यांचा आज स्मृतीदिन. त्यांचा जन्म ५ जून १८८१ रोजी सांगवडे (जि. कोल्हापूर) येथे झाला. त्यांच्या आईचे नाव अंबा. गोविंदरावांनी कोल्हापूर येथेच शालेय व महाविद्यालयीन शिक्षण घेतले व काही वर्षे सनदी वकिली केली. गायनाच्या कार्यक्रमात जाऊन त्यांना संवादिनी (हार्मोनियम) या वाद्याची आवड निर्माण झाली. प्रत्यक्ष या वाद्यवादनाचे रीतसर शिक्षण त्यांनी घेतले नव्हते, परंतु स्वप्रयत्नाने त्यांनी या वादनात प्रावीण्य मिळवले. गोविंदराव भास्करबुवा बखले यांच्या साथीला असायचे आणि बहुतेक वेळा संवादिनीचा एकपात्री प्रयोगही करायचे. ते बर्कतुल्ला सितारिये यांचे गंडाबंद शागीर्द होते.

१९११-१३ या काळात त्यांनी 'किर्लोस्कर नाटक मंडळी'त प्रमुख गायकनट म्हणून काम केले. पुढे १९१३-१५ या दरम्यान 'गंधर्व नाटक मंडळी'त सुरुवातीचे भागीदार व नट म्हणून त्यांनी काम केले. १९१७मध्ये त्यांनी स्वतःच्या 'शिवराज नाटक मंडळी' या संगीत नाटक मंडळीची स्थापना केली. यासाठी त्यांनी नवी नाटके लिहिली, पदे रचली आणि संगीतही दिले. 'धैर्यधर' (मानापमान), 'कच' (विद्याहरण), 'चारुदत्त' (मृच्छकटिक) या त्यांच्या काही प्रमुख गाजलेल्या भूमिका. त्यांनी मानपमान या नाटकास संगीतही दिले. १९३०च्या सुमारास त्यांनी चित्रपटसृष्टीमध्ये पदार्पण केले आणि प्रभात, इंपीरियल, ईस्ट इंडिया, मिनर्व्हा, नटराज इ. संस्थांच्या चित्रपटांमध्ये प्रमुख भूमिका केल्या तसेच संवादलेखन, गीतरचना व संगीतदिग्दर्शन या क्षेत्रांतही प्रशंसनीय कामगिरी केली. अयोध्येचा राजा या पहिल्या मराठी बोलपटात ते नायकाच्या प्रमुख भूमिकेत होते. या चित्रपटाचे संगीतदिग्दर्शनही त्यांनी केले होते. यांखेरीज त्यांनी अनेक नाटके लिहिली तसेच महाश्वेता, जयदेव, प्रतिमा इ. संगीतिका (ऑपेरा) लिहून त्या सादरही केल्या. १९३९मध्ये त्यांनी म्हैसूर संस्थानच्या युवराजांबरोबर यूरोपचा दौरा केला. तेथे त्यांना पोपच्या समोर कार्यक्रम करण्याची संधी मिळाली.

संवादिनी या साथीच्या वाद्याला टेंबे यांनी स्वतंत्र वाद्याची प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. पेटीवर बोटे टाकण्याची त्यांची पद्धत अंतःकरणाचा ठाव घेणारी होती. जयपूर घराण्याची तेढी, बिकट गायकी व अभिजात नाट्यसंगीत या दोहोंचे वादन ते सारख्याच कुशलतेने पेटीवर करीत. त्यांनी मराठी संगीताचा मानबिंदू अशा लक्षणगीतांची रचना केली. या लक्षणगीतांची ध्वनिमुद्रिकाही नंतर प्रकाशित करण्यात आली.

माझा संगीत-व्यासंग (१९३९), माझा जीवन विहार (आत्मचरित्र, १९४८), खाँसाहेब अल्लादियाखाँ यांचे चरित्र (१९५४), जीवनव्यासंग (१९५६) ही त्यांची महत्त्वाची ग्रंथनिर्मिती. टेंबे यांच्या ग्रंथांतून नाट्य व संगीताची दुनिया अतिशय हृद्यतेने रूपास आली आहे. भारत नाट्यसंमेलन (१९३३), मराठी रंगभूमी शतसांवत्सरिक उत्सव, नागपूर (१९४३), मराठी साहित्य परिषद, बडोदे आदींची अध्यक्षपदेही त्यांनी भूषविली. कोल्हापूरातील गायन समाज देवल क्लब या संस्थेशी त्यांचा निकटचा संबंध होता. ते या संस्थेचे काही काळ संचालकही होते. या संस्थेमध्ये त्यांच्या स्मरणार्थ गोविंदराव टेंबे रंगमंदिर उभारण्यात आलेले आहे. गोविंदरावांचे ९ ऑक्टोबर १९५५ रोजी दिल्ली येथे निधन झाले.

**-सुधीर पोटे**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# खास डिझाइन केलेली उशी तुमचे घोरणे कमी करू शकते?

उशी तुमचे घोरणे कमी करू शकते? सतत घोरणे त्रासदायक ठरू शकते, परंतु ते आरोग्य समस्यादेखील सूचित करू शकते. घोरणे टाळण्यासाठी मूळ कारण शोधून त्यावर उपचार करणे गरजेचे आहे. तज्ज्ञ वेज उशीपासून सुरुवात करण्याचा आग्रह करतात, ज्यामुळे तुम्हाला थोडा आराम मिळू शकेल.



विशेषतः वैद्यकीय दृष्टिकोनातून वेज उशी घोरणे रोखण्यासाठी फायदेशीर ठरू शकतात, झोपल्यावर तुम्ही तेव्हाच घोरता, जेव्हा घशाचे स्नायू शिथिल होतात आणि जिभेची स्थिती किंवा झोपेच्या वेळी नाक बंद झाल्यामुळे श्वासनलिकेला अर्धवट अडथळा येतो, तेव्हा घोरणे अनेकदा उद्भवते. वेज कुशन शरीराच्या वरच्या भागाला उंच करते, ज्यामुळे हवेचा प्रवाह सुधारतो आणि हे अडथळे कमी होतात, ही खास डिझाइन केलेली उशी आहे, तजी तुम्ही झोपत असताना तुमच्या शरीराच्या वरच्या भागाला आधार देण्यास मदत करते.

मूळ कल्पना म्हणजे तुमचे शरीर आणि डोके उंच ठेवा आणि तुमच्या वायुमार्गाचे संरेखन सुधारणा करा. हे तुमच्या घशाचे स्नायू आणि हवेचा प्रवाह रोखण्याचा धोका लक्षणीयरीत्या कमी करते, हे घोरण्याचे एक सामान्य कारण आहे, असे परळ येथील ग्लेनेगल हॉस्पिटलचे पल्मोनोलॉजी आणि फुफ्फुस प्रत्यारोपण विभाग संचालक डॉ. समीर गार्डे सांगितले की, प्रत्येकासाठी ही उशी आरामदायी वाटू शकत नाही. कदाचित त्याचा त्यांच्या झोपेच्या वेळेवर नकारात्मक परिणाम होऊ शकतो.

डॉ. हरिचरण यांनी असेही नमूद केले की, वेज कुशन हलके ते मध्यम घोरणे कमी करू शकतात, परंतु ते सर्व आजारांसाठी फायदेशीर नाही. जीवनशैलीतील बदल, जसे की वजन कमी करणे, झोपण्यापूर्वी अल्कोहोल टाळणे अशा काही गोष्टी वेज पिलोच्या वापरास पूरक असाव्या. गंभीर प्रकरणांमध्ये सीपीएपी (कंटिन्युअस पॉझिटिव्ह एअरवे प्रेशर) सारखे वैद्यकीय उपचार आवश्यक असू शकतात. घोरण्यासंबंधित समस्या दूर करण्यासाठी वेज कुशनची परिणामकारकता व्यक्तीपरत्वे बदलू शकते. जर तुम्ही दीर्घकाळ घोरत असाल, तर घरगुती उपाय वापरण्याऐवजी तुम्ही डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, असे डॉ. गार्डे म्हणाले.

काही प्रकरणांमध्ये घोरणे विविध अंतर्निहित आरोग्य स्थिती दर्शवू शकते, जसे की लठ्ठपणा किंवा तीव्र अनुनासिक रक्तसंचय. या किरकोळ परंतु गंभीर स्थितीकडे दुर्लक्ष केल्याने आरोग्य कालांतराने खराब होऊ शकते.

# महाडमध्ये कचरा समस्या कायम!

## "या ठिकाणी कचरा टाकू नये, कचरा टाकणारा मी गाढव आहे" बोर्ड वेधतोय लक्ष

**महाड : प्रतिनिधी**

महाडमध्ये आजही कचरा समस्या कायम असल्याचे निदर्शनास येत आहे. नगरपालिकेकडून संपूर्ण शहरात फिरवण्यात येणाऱ्या घंटागाड्या असल्या तरी अनेक नागरिक ठिकठिकाणी कचरा टाकत असल्याचे दिसून येत आहे. गंधारी नाका ते दस्तुरी नाका या परिसरातील नागरिक रस्त्यालगत कचरा टाकत असल्याने एका ठिकाणी बोर्ड लावण्यात आला आहे. "या ठिकाणी कचरा टाकू नये कचरा टाकणारा मी गाढव आहे"

महाड शहरामध्ये नगरपालिकेकडून गल्ली बोळातून घरोघरी जात घंटा गाड्यांमधून कचरा उचलण्याचे काम केले जात आहे. मात्र हे करीत असताना देखील नागरिकांची मानसिकता अजून बदललेली दिसून येत नाही. आपले शहर सुंदर आणि स्वच्छ असावे, याला देखील नागरिकांकडून प्रतिसाद मिळत नसल्याचे सध्याची परिस्थिती पाहिली तर उघड दिसून येत आहे.




महाड शहरात नगरपालिकेकडून शहरातील कचरा गोळा करण्यासाठी ठेकेदाराच्या माध्यमातून पाच घंटा गाड्या, एक ट्रॅक्टर आणि एक डंपर ठेवण्यात आलेला आहे. या पाच घंटा गाड्या सकाळ झाल्यापासून संपूर्ण महाड शहरात घरोदारी जाऊन कचरा गोळा करण्याचे काम करत असतात, त्याचबरोबर यातून दोन घंटागाड्या दुपारच्या वेळी शहरात फिरवल्या जातात. एक ट्रॅक्टर आहे, हा ही कचरा गोळा करण्यासाठी वापरला जातो नगरपालिकेचा एक डंपर सकाळी ९ ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत जवळपास दिवसभरच शहरातील कचरा गोळा करीत असतो. अशा परिस्थितीत नागरिकांनी आपल्या घरातील कचरा वेळेवर येणाऱ्या नगरपालिकेच्या घंटा गाड्यांमध्ये देणे गरजेचे आहे. मात्र शहराच्या अनेक भागात आज ही ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग पडलेले दिसून येत आहेत. याचाच अर्थ नागरिकांची मानसिकता अद्यापी कचऱ्यासंदर्भात बदललेली दिसून येत नाही.

सध्या परिस्थिती पाहिली तर महाड रायगड रोडवर एका नाल्या शेजारी परिसरातील नागरिकांनी टाकलेल्या कचऱ्याचा मोठा ढीग साठलेला आहे. त्याचप्रमाणे या व्यतिरिक्त गांधारी नाका ते दस्तुरी नाका या मार्गावर अनेक ठिकाणी रस्त्यालगत कचऱ्याचे ढीग आहेत. शहरातील गांधारी नाका ते दस्तुरी नाका रस्त्यालगत एका ठिकाणी रस्त्यालगत परिसरातील नागरिक कचरा टाकण्याचे काम करत होते. मोठ्या प्रमाणात कचऱ्याचा ढीग जमला होता. परिसरात दुर्गंधी आणि अस्वच्छता पसरली होती.

नगरसेवक वजीर भाई कोंडीवकर यांच्या पुढाकाराने हा परिसर स्वच्छ करण्यात आला होता. नागरिकांना समजून देखील या ठिकाणी कचरा टाकण्याचे काम सुरू राहिले. अखेर सध्या या ठिकाणी एक बोर्ड लावन्यात आला आहे. "या ठिकाणी कचरा टाकू नये कचरा टाकणारा मी गाढव आहे" सध्या हा बोर्ड चर्चेचा विषय बनला असला तरी या बोर्डाला देखील लोक जुमानत नसून आजही त्या ठिकाणी कचरा टाकण्याचे काम सुरूच आहे.

# वाशिवलीत गांजा सेवनप्रकरणी दोन जणांवर गुन्हा दाखल

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

वाशिवली गावाच्या हद्दीत प्रतिबंधित गांजा सिगारेटमध्ये भरून त्याचे सेवन करताना दोन जण आढळून आल्याने रसायनी पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई बुधवार, दि. ७ ऑक्टोबर रोजी रात्री करण्यात आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वाशिवली गावाच्या हद्दीतील डॉ.पारनेरकर महाराज हायस्कूलच्या उत्तर बाजूस असलेल्या गोकळ्या पटांगणात रात्री ९.१४ वाजण्याच्या सुमारास आरोपी ज्ञानेश्वर बाव्यजी जाधव (वय ७६, रा. वाशिवली) आणि साबर विनायक जाधव (वय २६, रा. वाशिवली) हे प्रतिबंधित गांजा सिगारेटमध्ये भरून ओढत असताना आढळून आले.या प्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाची फिर्याद पोलीस कर्मचारी शशांक पिंगळे (वय ४१) यांनी दिली आहे. गुन्हा ७ ऑक्टोबर रोजी रात्री ११.२१ वाजता दाखल करण्यात आला असून, या प्रकरणात अटक करण्यात आलेली नसल्याचे पोलीस नोंदीत नमूद आहे.

रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभिजीत भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रमोद जाधव करीत आहेत.या कारवाईमुळे वाशिवली परिसरात अंमली पदार्थांच्या सेवनाविरोधात पोलिसांकडून करण्यात येणाऱ्या कारवाईकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# गारमाळच्या जंगलातून तरुण बेपत्ता

## अपघात की घातपात?

**चौक : प्रतिनिधी**

गारमाळच्या रस्त्यावरून एका दुचाकीचा अपघात होऊन युवक बेपत्ता झाल्याची धक्कादायक घटना गुरुवारी पहाटे घडली आहे. पुण्यावरून राहुल सुमित मिश्रा (वय २३ रा नागपूर ) हा युवक काल खोपोलीतील गगनगिरी आश्रमात फिरण्यासाठी आला होता.



तो पहाटे गारमाळच्या जंगलात असलेल्या मिसिंग लिंक पॉईंट जवळ पर्यटनासाठी दुचाकीवरून आला होता. सकाळी या युवकाची दुचाकी रस्त्याच्या कडेला पडलेल्या अवस्थेत होती, तिथे त्याचा मोबाईल, बॅग आणि चप्पल ही गाडी जवळ पडली असल्याची मॉर्निंग वॉक साठी आलेल्या नागरिकांना दिसली .त्यांनी लगेच हेल्प फाउंडेशन आणि खोपोली पोलिसांची संपर्क साधून या घटनेची माहिती दिली, हेल्प फाउंडेशनची टीम तात्काळ घटनास्थळी दाखल होत शोध मोहीम चालू केली,

खोपोली पोलीस स्टेशनंचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांच्या नेतृत्वाखाली हेल्प फाउंडेशनचे सदस्य, खोपोली पोलीस स्टेशनंचे कर्मचारी, शिवदुर्ग मित्र मंडळाची टीमने आणि स्थानिक ग्रामस्थांनी दरीत उतरून जोरदार शोध मोहीम सुरु केली तर, ड्रोनच्या साहाय्याने अनेक वेळा दरीची पाहणी केली, मात्र दिवसभर शोध मोहीम करूनही त्या युवकाचा शोध लागला नाही, त्यामुळे या युवकाचा अपघात आहे कि घातपात? असा संशय व्यक्त केला आहे, या घटनेचा कसून पुढील तपास खोपोली पोलीस स्टेशनंचे पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांच्या नेतृत्वाखाली खोपोली पोलीस करीत आहेत.

# भारतीय सैन्यदलामध्ये अधिकारीपदाच्या पूर्व प्रशिक्षणाची मोफत सुवर्णसंधी

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

भारतीय सैन्यदल नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना (SSB) या परीक्षेची पूर्व तयारी करुन घेणेसाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे महाराष्ट्र शासनातर्फे महाराष्ट्रातील नवयुवक व नवयुवतीसाठी दि. १९ ऑक्टोबर ते दि.२८ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत SSB कोर्स क्र.६७ आयोजित करण्यात येत आहे.

रायगड जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी सैन्य दलामध्ये अधिकारी पदाच्या पूर्व प्रशिक्षणाच्या मोफत सुवर्ण संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, रायगड यांनी केले आहे.निवड झालेल्या प्रशिक्षणार्थीनी केंद्रामध्ये दि.१८ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता प्रशिक्षण केंद्रात हजर राहावे. कोर्स कालावधीत प्रशिक्षणार्थीना निःशुल्क प्रशिक्षण, निवास व भोजन दिले जाते.

या वर्गामध्ये प्रवेश मिळण्यासाठी कम्बाइंड डिफेन्स सर्व्हीसेस एक्झामिनेशन अथवा नॅशनल डिफेंस ॲकेडमी एक्झामिनेशन (NDA-UPSC) पास झालेली असावी व त्यासाठी सर्व्हिसेस सिलेक्शन बोर्ड मुलाखतीसाठी पात्र झालेले असावे. एनसीसी स्पेशल एन्ट्री साठी एस.एस.बी. मुलाखतीसाठी कॉल लेटर असावे. टेक्नीकल ग्रॅज्युएट कोर्ससाठी एस.एस.बी. मुलाखतीसाठी कॉल लेटर असावे.

# 'अंगणवाडी सेविकांवर पोषणासोबत संस्कारांचीही मोठी जबाबदारी'

**मुरुड : प्रतिनिधी**

बालकाच्या जन्मापासून त्याच्या सर्वांगीण वाढीपर्यंत कुटुंबाची महत्त्वाची भूमिका असते. मात्र, बालक अंगणवाडीत दाखल झाल्यानंतर त्याच्या पोषणासोबतच आरोग्य, लसीकरण, संस्कार आणि सर्वांगीण विकासाची जबाबदारी अंगणवाडी सेविका व मदतनीस समर्थपणे पार पाडतात, असे प्रतिपादन रायगड जिल्हा परिषद सदस्या मानसीताई दळवी यांनी मुरूड दरबार हॉल येथे रायगड जिल्हा परिषद एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्पांतर्गत आयोजित सेवा संकल्प अभियान व पोषण महाअभियान सांगता समारंभात त्या बोलत होत्या.

यावेळी रायगड जिल्हा परिषद महिला बालकल्याण समिती सभापती रसिका केणी,मुरूड पंचायत समिती सभापती निलेश घाटवळ,उपसभापती अश्विनी जंगम,रायगड जिल्हा परिषद सदस्या ज्योती नागांवकर,रायगड जिल्हा परिषद सदस्य विघ्नेश माळी, कामगार संघटनेचे तालुकाध्यक्ष दिनेश मिनमिने,वावडुंगी सरपंच ऋतुजा वरणकर,राजपुरी गण महिला



संघटकजिविता मिनमिने, युवा उपजिल्हाप्रमुख दिपेश वरणकर, तेलवडे उपसरपंच निलेश तांबडकर, उपमुख्यकार्यकारी अधिकारी रायगड जिल्हा परिषदप्रविण पाटील, बालविकास प्रकल्प अधिकारी मुरूड संजय शेडगे, पंचायत समिती गटविकास अधिकारी राजेंद्रकुमार खताळ,उर्वशी वाडकर,विजया पाशिलकर, विजया खेऊर आदिसहअंगणवाडी सेविका, मदतनीस आणि उपस्थित होते.

रायगड जिल्हा परिषद सदस्या मानसीताई दळवी पुढे म्हणाले की बालकाच्या वाढीच्या विशिष्ट वयात उंची व वजन झपाट्याने वाढत असल्याने या काळात प्रथिने, जीवनसत्त्वे आणि अन्य पोषक घटक योग्य प्रमाणात मिळणे आवश्यक असल्याचे दळवी यांनी सांगितले. आहारासोबत लसीकरण, नियमित आरोग्य तपासणी आणि योग्य सवयी लावण्यात अंगणवाडी सेविकांची भूमिका महत्त्वाची असल्याचे त्यांनी नमूद केले. कोरोना काळात अंगणवाडी सेविकांनी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता जबाबदारी पार पाडल्याबद्दल दळवी यांनी त्यांचे विशेष कौतुक केले. घर, अंगणवाडी तसेच विविध प्रशासकीय कामांचा अतिरिक्त भार सांभाळणाऱ्या सेविकांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्यासाठी वरिष्ठ पातळीवर पाठपुरावा करण्याची ग्वाही मानसीताई दळवी यांनी दिली.

महिला व बालकल्याण समिती सभापती रसिका केणी यांनीही अंगणवाडी सेविकांच्या विविध मागण्यांसाठी ठोस पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. अल्प मानधनातही सेविका बालकांच्या पोषण व विकासासाठी मेहनत घेत असल्याचे त्यांनी सांगितले. एसआयआरमध्ये काम केलेल्या सेविकांना मोबदला मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमात अंगणवाडी सेविकांनी 'पोषण मंगळागौरी' सादर करून भाजीपाला, फळे, डाळी, कडधान्ये, दूध व पौष्टिक पदार्थांचा आहारात समावेश करण्याचा संदेश दिला.

**म्हसळा नगरपंचायत म्हसळा**
coudmhasla@maharashtra.gov.in
०२१४९-२३२२४५

**शुद्धिपत्रक**

म्हसळा नगरपंचायतीच्या विविध कामांसाठी JCB मशीन व ट्रॅक्टर भाड्याने लावणे या कामाची निविदा दि. २९/०९/२०२६ रोजी दैनिक रामप्रहर या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध करण्यात आली होती. परंतु विहित मुदतीत किमान निविदा प्राप्त न झाल्याने सदर निविदा दुसरी वेळ भरणेकरिता दि. १३/१०/२०२६ सायं. ०६.०० वा पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

दि. ८/१०/२०२६
जा.क्र./म्हनप/१२६०/२०२६-२७

**सही/-**
**मुख्याधिकारी**
म्हसळा नगर पंचायत

# पुणे शिक्षक व पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत युवानेते निलेश थोरे यांच्यावर महत्त्वाची जबाबदारी

**माणगाव : प्रतिनिधी**

आगामी पुणे शिक्षक व पदवीधर मतदारसंघ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाचे दक्षिण रायगड जिल्हा युवा मोर्चा अध्यक्ष युवानेते निलेश कुंडलिक थोरे यांची निवडणूक प्रचारक म्हणून महत्त्वपूर्ण नियुक्ती करण्यात आली आहे.भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्रजी चव्हाण, पुणे शिक्षक व पदवीधर मतदारसंघ निवडणूक प्रभारी ना.चंद्रकांतदादा पाटील, सहप्रभारी तथा केंद्रीय मंत्री ना.मुरलीधर मोहोळ आणि दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष तथा माजी खासदार धैर्यशीलदादा पाटील यांच्या सूचनेनुसार ही नियुक्ती जाहीर करण्यात आली.

निलेश थोरे उच्चशिक्षित युवा नेतृत्व असून शिक्षक व पदवीधर मतदारांच्या प्रश्नांची जाण, त्यांच्याशी प्रभावी संवाद साधण्याची क्षमता आणि संघटनात्मक कामाचा अनुभव ही त्यांची प्रमुख बलस्थाने आहेत.यापूर्वी कोकण पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीमध्ये प्रचाराचे नियोजन आणि पक्षाची संघटनात्मक यंत्रणा प्रभावीपणे राबविण्याचा अनुभव निलेश थोरे यांना आहे. बूथस्तरापासून वरिष्ठ पदाधिकाऱ्यांपर्यंत समन्वय साधत कार्यकर्त्यांना सक्रिय करण्याची त्यांची कार्यपद्धती पक्षात विशेष उल्लेखनीय मानली जाते.

दक्षिण रायगड जिल्ह्यात युवा मोर्चाच्या माध्यमातून विविध सामाजिक, संघटनात्मक आणि जनसेवेच्या उपक्रमांचे नियोजन व अंमलबजावणी करताना त्यांनी तरुण कार्यकर्त्यांचे मजबूत नेटवर्क उभे करण्यावर विशेष भर दिला आहे. सर्वसामान्य कार्यकर्त्यांमध्ये सहज मिसळण्याची क्षमता, सातत्याने संवाद साधण्याची शैली आणि दिलेली जबाबदारी नियोजनबद्ध पद्धतीने पूर्ण करण्याची कार्यक्षमता यामुळे त्यांच्यावर पुणे शिक्षक व पदवीधर मतदारसंघाची जबाबदारी सोपविण्यात आल्याचे मानले जात आहे.

**रोहा अष्टमी नगर परिषद**
**ता. रोहा, जि.रायगड पिन कोड नं. ४०२१०९**
फोन नं. कार्यालय - ०२१९४/२३५७३७ फॅक्स नं.०२१९४/२३४०७८
email : rohanagarpalika@gmail.com

क्र. रोनप/पापु/ फेर.नि.सु./१७१२/२०२६ दिनांक-०८-१०-२०२६

**निविदा सूचना**

रोहा अष्टमी नगर परिषद, रोहा नगर परिषद यांस कडून नोंदणीकृत अनुभवी व इच्छुक ठेकेदारांकडून नगर परिषदेच्या पाणीपुरवठा व बांधकाम विभागाकरिता १) रोहा अष्टमी नगर परिषद पाणीपुरवठा विभागाकरिता आवश्यक यांत्रिकी साहित्य पुरवठा करणे (द्वितीय प्रसिध्दी ) २) रोहा अष्टमी नगर परिषद पाणीपुरवठा विभागाकरिता मागणीनुसार चेक नट/ स्पिंडल पुरवठा करणे (द्वितीय प्रसिध्दी ) ३) रोहा अष्टमी नगर परिषद मालकिच्या जनरेटर्स यांची सर्व्हिसिंग / दुरूस्ती करणे (प्रथम प्रसिध्दी ) कामाचे निविदा दरपत्रक मागविणेत येत आहेत. सदर संपुर्ण निविदा प्रक्रिया ऑफलाईन पध्दतीने होईल. निविदा नोटीस प्रसिध्दी, सुचना, आवश्यक असणारी कागदपत्रे, शुद्धिपत्रक इत्यादी माहिती नगर परिषद कार्यालयातील पाणीपुरवठा विभागात व बांधकाम विभागात दिनांक ०९-१०-२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजले पासून १९-१०-२०२६ पर्यंत दुपारी ४.०० वाजेपर्यंत उपलब्ध होईल.

**सही/-**
**(अजयकुमार एडके)**
मुख्याधिकारी
रोहा अष्टमी नगर परिषद

**सही/-**
**वनश्री अवनी समिर शेडगे**
नगराध्यक्षा
रोहा अष्टमी नगर परिषद

# शंतनु कुवेसकर यांची मानद वन्यजीव रक्षकपदी नियुक्ती

**माणगाव : बातमीदार**

रायगड जिल्ह्याच्या समृद्ध जैवविविधतेचे जतन, वन्यजीव संरक्षण आणि पर्यावरण संवर्धनासाठी गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने कार्यरत असलेले माणगावचे वन्यजीव अभ्यासक, निसर्ग छायाचित्रकार व माहितीपट निर्माते शंतनु कुवेसकर यांची महाराष्ट्र शासनाच्या वनविभागामार्फत रायगड जिल्ह्याच्या मानद वन्यजीव रक्षकपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

माणगावसह संपूर्ण रायगड जिल्ह्यातील जंगल, डोंगररांगा, नद्या, खाडीक्षेत्र, समुद्रकिनारे आणि ग्रामीण भागातील जैवविविधतेचा कुवेसकर सातत्याने अभ्यास करीत आहेत. विविध वन्यजीव व पक्ष्यांच्या



नोंदी करण्याबरोबरच त्यांच्या अधिवासाचे संरक्षण, स्थानिक नागरिकांमध्ये जनजागृती आणि वन्यजीव-मानव संघर्षाच्या प्रसंगी संवेदनशील हस्तक्षेप यावर त्यांनी विशेष भर दिला आहे.

रायगड जिल्ह्यातील पक्षीवैभव आणि जैवविविधता महाराष्ट्रासह देश-विदेशात पोहोचविण्यात त्यांच्या छायाचित्रण व अभ्यासाचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले आहे. शालेय जीवनापासून पर्यावरण क्षेत्राशी जोडलेल्या कुवेसकर यांनी तरुण तसेच ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये निसर्ग व वन्यजीव संवर्धनाबाबत जागृती निर्माण करण्याचे काम केले आहे. निसर्ग छायाचित्रण, पक्षीनिरीक्षण, निसर्गभ्रमंती, पर्यटन, माहितीपट आणि लेखनाच्या माध्यमातून त्यांनी रायगडची नैसर्गिक संपदा जगासमोर आणली.

माणगाव तालुक्यासह रायगड जिल्ह्यातील विविध वन्यजीव बचाव मोहिमांमध्येही कुवेसकर यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. मगर, अजगर, पिसोरी हरीण, खवले मांजर, वाघाटी यांसारख्या वन्यप्राण्यांसह विविध पक्ष्यांच्या बचावकार्यात त्यांनी वनविभाग व स्थानिक नागरिकांसोबत काम केले आहे. त्यामुळे त्यांचे कार्य केवळ वन्यजीव निरीक्षणापुरते मर्यादित न राहता वन्यजीव आणि स्थानिक समाज यांच्यातील संवेदनशील दुवा म्हणूनही महत्त्वाचे ठरले आहे.

रायगडच्या काळ नदी परिसरातील पाणमांजरांच्या वर्तनाचा अभ्यास ते गेल्या दशकाहून अधिक काळ करीत आहेत. तसेच रायगड जिल्ह्यातील महाधनेश (ग्रेट हॉर्नबिल) पक्ष्यांच्या विणीच्या हंगामाचा गेल्या १५ वर्षांपासून अभ्यास त्यांनी केला आहे. हिमालयीन ग्रिफन गिधाडे, विविध घुबड प्रजाती, शिकारी पक्षी, स्थलांतरित पक्षी, साप, फुलपाखरे, कीटक व पतंगांच्या अनेक प्रजातींच्या नोंदीही त्यांनी जिल्ह्याच्या विविध भागांत केल्या आहेत.

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पनवेल**
**पिनकोड - ४१०२०६**
E-mail- panvel.ee@mahapwd.gov.in
दूरध्वनी क्रमांक ०२२- २७४५२७७८ फॅक्स - ०२२ - २७४६७४४०

**ई- कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र. ०८**
**( ई-निविदा) सन २०२६-२७**

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दुरध्वनी क्र. ०२२-२७४५२७७८ फॅक्स - ०२२-२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील नोंदणीकृत कंत्राटदाराला योग्य त्या कामांकरीता बी-१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई-निविदा सुचना www.mahapwd.com and www.mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.

टिप- या निविदेमध्ये एकूण ४ काम समाविष्ठ असून ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक ०९.१०.२०२६ सकाळी १०.०० ते दिनांक १६.१०.२०२६ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेत स्थळावर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. www.mahatenders.gov.in

ई-निविदाजा.क्र./ सा.बां./पनवेल/
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां. विभाग, पनवेल, जि. रायगड
दिनांक : ८/१०/२०२६

**सही/-**
**कार्यकारी अभियंता,**
सार्वजनिक बांधकाम विभाग, पनवेल

आरओसी-२०२६-२७/क्र.-५/सी३१५२

**पनवेल महानगरपालिका, पनवेल**
तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड ४१०२०६

जा.क्र.पमपा/सचिव/२०-२६/प्र.क्र.११/३५२/२६
महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- ०८/१०/२०२६

**पनवेल महानगरपालिकेच्या विशेष सर्वसाधारण सभेची सूचना**

प्रति,
श्री. /श्रीमती. ..................................
मा.सदस्य/सदस्या,
पनवेल महानगरपालिका, पनवेल.

महोदय/महोदया,

पनवेल महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा क्र. ११, गुरुवार दिनांक १५/१०/२०२६ रोजी, सकाळी ११:३० वाजता, महापालिकेच्या "आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल" येथे खालील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी बोलविण्यात आली आहे.

**विशेष सर्वसाधारण सभा क्रमांक ११.**
**दिनांक १५/१०/२०२६ ची विषयपत्रिका**

**१. मा. आयुक्त महोदयांकडील कार्यालयीन कामकाज :**

१. पनवेल महानगरपालिकेची स्वतःच्या मालकीची परिवहन सेवा सुरु करणेबाबत.

२. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील रेल्वे फाटक नसलेल्या ठिकाणी महारेलमार्फत उड्डाणपुले (ROB) बांधण्याबाबत.

३. जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२५-२६ नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) या योजनेअंतर्गत ७८ कामांना मा. प्रशासकीय महासभेची मंजुरी मिळणेबाबत.

४. समाज विकास विभागाअंतर्गत पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वास्तव्य करणाऱ्या युवकांसाठी तांत्रिक (Technical) तसेच अतांत्रिक (Non-Technical) विविध विषयांवरील कौशल्य विकास प्रशिक्षणाचे मोफत कार्यक्रम राबविणेबाबत तसेच समाज विकास विभाग अंतर्गत पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वास्तव्य करणाऱ्या युवकांसाठी नवी मुंबई - AIR PORT संबंधीत मोफत प्रशिक्षण कार्यक्रम राबविणेबाबत.

५. "समाज विकास विभाग" अंतर्गत पनवेल हद्दीतील युवकांसाठी महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र यांच्या मदतीने (MCED) तांत्रिक लघु उद्योजकता विकास प्रशिक्षणाचे मोफत कार्यक्रम राबविणेबाबत.

६. पनवेल महानगरपालिका क्षेत्रासाठी वृक्ष प्राधिकरण समिती गठीत करण्याच्या अनुषंगाने नावे नामनिर्देशित करण्याबाबत.

**(मा. महापौर महोदय यांचे मंजुरीने व आदेशान्वये)**

महापालिका भवन,पनवेल
दिनांक :- ०८/१०/२०२६.

**सही/-**
**नानासाहेब कामठे**
**महापालिका सचिव**
पनवेल महानगरपालिका

# नवी मुंबईवर धुरक्याची चादर



**नवी मुंबई : बातमीदार**

पावसाळा संपताच नवी मुंबईच्या हवेत पुन्हा प्रदूषणाची दाहकता जाणवू लागली आहे. सकाळी आणि विशेषतः रात्रीच्या वेळी शहरातील अनेक भागांत धुरके पसरत आहे. काही ठिकाणी उग्र वासामुळे नागरिक हैराण झाले आहेत. वाढती वाहनसंख्या, विकासकामांमुळे हवेत मिसळणारे धूलिकण आणि थंड वातावरणामुळे हवेत साचणारे प्रदूषके यामुळे परिस्थिती अधिक गंभीर होत आहे. त्याचवेळी तुर्भे आणि पावणे एमआयडीसीतील काही कारखान्यांच्या उत्सर्जनाबाबतही नागरिकांकडून संशय व्यक्त होत असल्याने शहराच्या हवेची गुणवत्ता पुन्हा चर्चेत आली आहे.

पावसामुळे रस्त्यांवरील धूलिकण हवेत मिसळत नाहीत त्यामुळे प्रदूषणाचे प्रमाण कमी असते. मात्र पाऊस ओसरल्यानंतर रस्ते कोरडे होतात आणि धूळ पुन्हा हवेत मिसळते. नवी मुंबईतील वाढती वाहतूक, येथे सुरू असलेली बांधकामे यामुळे हवेत सूक्ष्म आणि मध्यम आकाराचे धूलिकण वाढत आहेत. त्यातच थंड वातावरणात हवेची घनता वाढल्याने ही प्रदूषके वातावरणाच्या खालच्या थरात अधिक काळ टिकून राहत आहेत. परिणामी रात्री आणि पहाटेच्या वेळी धुरकटपणा अधिक जाणवत असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सूचनांनुसार, हवेतील सूक्ष्म (पीएम-१०) आणि अतिसूक्ष्म धूलिकण (पीएम-२.५) श्वसनमार्ग आणि फुफ्फुसांवर परिणाम करू शकतात. त्यामुळे डोळ्यांची जळजळ, घसा खवखवणे, खोकला, श्वास घेण्यास त्रास आणि दम लागण्याच्या तक्रारी वाढू शकतात.

> *पावसाळा संपल्यानंतर वातावरणात बदल होतात. कोरड्या वातावरणामुळे हवेत धूलिकण मिसळले जात असून, हवेची घनता वाढल्यावर हे धूलिकण हवेत स्थिर होतात. त्यामुळे अनेक भागांत दृष्यमानता घटण्याच्या तक्रारी येत आहेत. प्रदूषणाबाबतही तक्रारी प्राप्त होत असून, मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार या सर्व बाबींचा मंडळाकडून अभ्यास सुरू आहे. परिस्थितीचा आढावा घेऊन योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.*
>
> **– सचिन अडकर,**
> प्रादेशिक अधिकारी (नवी मुंबई),
> महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

### धूलिकणांसह वातावरणीय बदलांचा परिणाम

लहान मुले, ज्येष्ठ नागरिक तसेच श्वसन व हृदयविकार असलेल्या नागरिकांना याचा अधिक त्रास होण्याची शक्यता असते.

तुर्भे आणि पावणे एमआयडीसीलगतच्या वाशी, कोपरीगाव, कोपरखैरणे, बोनकोडे आणि घणसोली परिसरात रात्री आणि पहाटेच्या वेळी उग्र वास येत असल्याच्या तक्रारी नागरिक करत आहेत. काही नागरिकांकडून हा वास काडीपेटी जळल्यासारखा किंवा रसायनमिश्रित असल्याचे सांगितले जात आहे. औद्योगिक परिसरातून नेमके कोणते वायू किंवा प्रदूषक हवेत मिसळत आहेत, हे तपासल्याशिवाय दुर्गंधीचा स्रोत निश्चित करता येणार नाही. मात्र, तक्रारींचे गांभीर्य लक्षात घेता कारखान्यांना पूर्वकल्पना न देता रात्रीच्या वेळी तपासणी करण्याची मागणी पर्यावरणवादी कार्यकर्ते प्रा. विनिलकुमार सिंग यांनी केली आहे.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या समीर ॲपनुसार, नवी मुंबईच्या हवा गुणवत्ता निर्देशांकातही अलीकडच्या दिवसांत चढ-उतार झाले आहेत. ६ ऑक्टोबरला शहराचा निर्देशांक ११८पर्यंत पोहोचला होता. ७ ऑक्टोबरला सकाळी १०.०५ वाजता तो ८७ वर आला. १००पर्यंतचा निर्देशांक समाधानकारक मानला जात असला तरी संवेदनशील नागरिकांना सावध करणारा आहे.

वाढत्या प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासनाने सर्व विभागांमध्ये सखोल स्वच्छता मोहीम राबविण्याची तयारी सुरू केली आहे. रस्त्यांवरील धूळ आणि कचऱ्यामुळे हवेत धूलिकण मिसळू नयेत यासाठी स्वच्छतेवर भर देण्यात येणार आहे. त्यासोबतच फॉगिंग यंत्रणाही सक्रिय करण्यात आली असून, प्रदूषण नियंत्रणासाठी आवश्यक त्या सर्वतोपरी उपाययोजना केल्या जात असल्याची माहिती पर्यावरण विभागाने दिली आहे.

# दोन महिन्यानंतरही मच्छीमारांना सॅटेलाईट फोनची सेवा प्रतीक्षा!

**उरण : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री, मत्स्यव्यवसाय मंत्र्यांनी आपात्कालीन परिस्थितीत त्वरित संपर्क साधून बचाव करण्यासाठी मच्छीमारांना वाटप करण्यात आलेले लाखो रुपये किंमतीचे सॅटेलाइट फोनची सेवा दोन महिने उलटून गेल्यानंतरही अद्यापही सुरू झालेली नाही. सुमारे सवा लाख रुपये खर्च करूनही प्रशासनाकडून कार्यवाही न झाल्याने सॅटेलाइट फोनची सेवा कुचकामी ठरली असून मच्छीमारांना तिची प्रतीक्षा आहे.

राज्यातील मच्छीमारांना खोल समुद्रात मासेमारी करताना कोणत्याही परिस्थितीत किनाऱ्याशी संपर्क साधता यावा, आपत्कालीन प्रसंगी तत्काळ मदत मिळावी आणि हवामान तसेच सुरक्षा सूचना वेळेवर प्राप्त व्हाव्यात यासाठी महाराष्ट्र सरकारने सॅटेलाइट फोन योजना आणली आहे. राज्याच्या मच्छीमारांसाठी सुरक्षा प्रथम या धोरणानुसार आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यावर भर देण्यात येत आहे. यासाठी मत्स्यव्यवसाय विभागाने भारत संचार निगम लिमिटेडच्या (बीएसएनएल) अधिकाऱ्यांशी सेवा देण्याबाबत चर्चा करूनच बीएसएनएल ग्लोबल सॅटेलाईट फोन सेवा सुरू करण्यात येणार असल्याचे मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी सांगितले होते. यानंतर प्रायोगिक तत्त्वावर काही मच्छीमारांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांच्या उपस्थितीत काही मच्छीमारांना सॅटेलाईट फोनचे वाटपही जुलै महिन्यात करण्यात आले होते. त्यावेळी १६ सप्टेंबरपासून ही आपात्कालीन सॅटेलाईट फोनची सेवा कार्यान्वित होणार असल्याचेही मंत्र्यांनी स्पष्ट केले होते.



> *खोल समुद्रात मासेमारी करणाऱ्या मच्छीमारांसाठी आपात्कालीन परिस्थितीत बचावासाठी सुरू करण्यात आलेली सॅटेलाईट फोन सेवा कार्यान्वित झालेली नाही. याची माहिती घेतली जात आहे.*
>
> ***–महेश देवरे,** सहआयुक्त, मत्स्यव्यवसाय विभाग*

यानंतर खोल समुद्रात मासेमारी करणाऱ्या मच्छीमारांसाठी आपात्कालीन परिस्थितीत अत्यंत महत्त्वाची ठरणारी सॅटेलाईट फोन सेवा उपलब्ध करून देण्यासाठी मच्छीमारांनी सवा लाख किंमत असलेले सॅटेलाईट फोन खरेदी केले आहेत. यासाठी मासिक सहा हजार रुपये खर्च करून रिचार्ज मारला. यामध्ये रायगड जिल्ह्यातील २५ मच्छीमारांचा समावेश असून त्यापैकी १०-१२ करंजा-उरण येथील मच्छीमारही असल्याची माहिती व्यावसायिकांनी दिली, मात्र मागील दोन महिन्यांनंतरही सॅटेलाईट फोन सेवा सुरूच झाली नसल्याची माहिती करंजा येथील व्यावसायिक रोहन नाखवा यांनी दिली.

मच्छीमारांचे प्राण आणि उपजीविका सुरक्षित ठेवण्यासाठी शासनाने मोठा गाजावाजा करून सर्वोच्च प्राथमिकता देणारी मच्छीमारांसाठी जीवनदायी सॅटेलाईट फोन सेवाच सुरूच झालेली नाही.

# नेरूळ येथे विकसित भारत संकल्प सभा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

भाजप नवी मुंबई जिल्ह्याच्या वतीने तसेच जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील यांच्या आयोजनातून शिरवणे विद्यालय व ज्युनियर कॉलेज, नेरुळ या ठिकाणी विकसित भारत संकल्प सभेचे आयोजन बुधवारी करण्यात आले होते.

या निमित्ताने बाईक रॅलीचे देखील आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला आमदार मंदा म्हात्रे, विधान परिषदेचे आमदार विक्रांत पाटील, माजी खासदार डॉ.संजीव नाईक, महापौर सुजाता पाटील, उपमहापौर दशरथ भगत, भाजपा नवी मुंबई जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील आणि ठाणे कोकण विभागीय कार्यालय मंत्री अभिजीत पेडणेकर, आजी माजी नगरसेविका, नगरसेवक, मंडळ अध्यक्ष, भाजपा पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.



नवी मुंबई जिल्ह्याच्या वतीने जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील यांच्या माध्यमातून भारत विकास यात्रा बाईक रॅलीचे आयोजन नेरुळ येथे करण्यात आले होते. यानिमित्त पंतप्रधान मोदी यांनी सर्व जनतेला संबोधित केलं. या माध्यमातून नवी मुंबईतील लोकांमध्ये कार्यकर्त्यांमध्ये विकसित भारत कसा असेल याचं स्वप्न मोदींनी सर्वांसमोर ठेवलं. त्यांचं २५ वर्षांचं कार्य असंच अविरत सुरू राहणार आहे, असे आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले.

प्रसंगी डॉ. राजेश पाटील यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सेवा समर्पित २५ वर्षांच्या कार्याचा आदर म्हणून भाजपच्या माध्यमातून संपूर्ण देशभर सेवा संकल्प अभियान राबवण्यात आलेलं आहे.

# कळंबोलीत 'बालपण देगा देवा' ; सरगम लायन्स क्लबचा उपक्रम

**कळंबोली : बातमीदार**

लायन्स क्लब इंटरनॅशनल अंतर्गत लायन्स क्लब पनवेल सरगम आणि सुधागड विद्या संकुलात विद्यार्थ्यांसाठी लहानपण दे गा देवा हा मानसिक स्वास्थ व आरोग्य वर्धक कार्यक्रम लायन्स क्लब सरगम या संस्थेच्या सेक्रेटरी , ख्यातनाम वया लायन लेडी मानदा श्री पंडित यांनी अमोघ वक्तृवशैलीने विद्यार्थ्यांना हसत खेळत उद्बोधन केले.

मानसिक आरोग्यावर परिणाम करणारे दैनंदिन जीवनातील प्रसंगांची उदाहरणे देत देत अप्रतिम सादरीकरण डॉ मानदा यांनी केले.यावेळी डॉ मानदा यांनी विद्यार्थ्यांना काही टास्क दिलेत व त्याप्रमाणे प्रश्नोत्तर स्वरूपात विद्यार्थ्यांशी हितगुज साधली. शिवाय पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन आणि ऑडिओ संगीताची जोड आपल्या व्याख्यानाला दिलेली असल्याने विद्यार्थ्यांसह शिक्षकांनाही मानसिक संतुलनाचे फायदे त्यांनी नमूद करून सांगितले. जवळपास ४०० विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी बालपण दे गा देवा हा उपक्रम आनंददायी ठरवण्यात डॉ मानदा पंडित यांचे वक्तृत्व कौशल्य फलद्रूप ठरले.



या सत्रासाठी आवर्जून उपस्थित राहिलेले लायन्स क्लब डिस्ट्रिक्ट गवर्नर लायन प्रवीण सरनाईक ,सुधागड विद्यासंकुलाचे प्राचार्य श्री राजेंद्र बाजीराव पालवे , लायन्स क्लब पनवेलचे पदाधिकारी लायन लेडी डॉ मानदा श्री पंडित , लायन मिलिंद जोशी , लायन डॉ नमिता मिश्रा , लायन आदित्य दोषी ,लायन संजय गोडसे असे मान्यवर कार्यक्रम प्रसंगी व्यासपीठावर विराजमान होते.

यावेळी लायन्स क्लब डिस्ट्रिक्ट गवर्नर लायन प्रवीण सरनाईक म्हणाले आजची कॉलेजची तरुणाईचे विशेषतः जेन Z चे. मला खूप कौतुक वाटते की इतर पिढ्यांच्या मनाने हे तरुण व्यसनांपासून लांब आहेत.

# घटस्थापना आणि दसरा निमित्ताने वाहनांना प्रवेशबंदी



**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

११ सप्टेंबर ते २० सप्टेंबर दरम्यान घटस्थापना आणि दसरा सण आहे. या सणाच्या पार्श्वभूमीवर पनवेल शहर वाहतूक शाखेच्या कार्यक्षेत्रातील काही ठिकाणी ९ ऑक्टोबर रोजी सकाळी दहा वाजल्यापासून ते ११ ऑक्टोबर रोजी रात्री नऊ वाजेपर्यंत तसेच १७ ऑक्टोबर रोजी सकाळी सहा ते २० ऑक्टोबर रोजी रात्री बारा वाजेपर्यंत सर्व प्रकारच्या वाहनांना बंदी करण्यात आली आहे.

छत्रपती शिवाजी महाराज चौक-कर्नाळा भाजी मार्केट, कर्नाळा भाजी मार्केट ते छत्रपती शिवाजी महाराज चौक, कर्मवीर भाऊराव पाटील चौक ते कर्नाळा भाजी मार्केट सर्कल हा मार्ग येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांच्या वाहतुकीस बंद करण्यात आला आहे. तसेच उरण नाका ते टपाल नाका कर्नाळा भाजी मार्केट सर्कल कडे येणाऱ्या वाहनांना बंदी घोषित करण्यात आली आहे.

पर्यायी मार्ग छत्रपती शिवाजी महाराज चौक, पंचरत्न चौक आणि कर्मवीर भाऊराव पाटील चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक आशा मार्गाने वाहने जातील तसेच उरण नाक्याकडून येणारी वाहने ही पंचरत्न चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक किंवा विश्राळी नाका मार्गे जातील. पार्किंगची व्यवस्था गुजराती शाळा पटांगण, सरस्वती विद्यालय (नाट्यगृहासमोरील), वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह इत्यादी ठिकाणी करण्यात आली असल्याचे वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक सुभाष पुजारी यांनी सांगितले.

# नवी मुंबई मनपा सरळसेवा भरतीतील १६० पदांची निवडसूची जाहीर

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या सरळसेवा भरती प्रक्रियेतील १५ संवर्गांमधील १६० पदांसाठी गुणवत्ता यादी, निवडसूची आणि प्रतीक्षायादी बुधवारी (७ ऑक्टोबर) जाहीर करण्यात आली. लेखा लिपिक, कक्षसेविका, कक्षसेवक यांसह विविध पदांचा या यादीत समावेश असून, निवड झालेल्या उमेदवारांची कागदपत्रे आणि आवश्यक प्रमाणपत्रांची पडताळणी झाल्यानंतरच नियुक्तीची पुढील प्रक्रिया केली जाणार आहे.

महापालिकेच्या नियमित आस्थापनेवरील गट-क आणि गट-डमधील ३० संवर्गांतील पदे सरळसेवेने भरण्यासाठी २७ मार्च २०२५ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. या भरती प्रक्रियेसाठी राज्यातील २८ परीक्षा केंद्रांवर १६, १७, १८ आणि १९ जुलै २०२५ रोजी वस्तुनिष्ठ बहुपर्यायी पद्धतीची ऑनलाइन परीक्षा घेण्यात आली होती. या परीक्षेतील ३० संवर्गांचे गुणपत्रक ११ सप्टेंबर २०२६ रोजी महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले होते.



दरम्यान, संबंधित याचिकेच्या अनुषंगाने मुंबई उच्च न्यायालयाने १६ सप्टेंबर २०२६ रोजी दिलेल्या आदेशानुसार जाहिरातीत नमूद संवर्गनिहाय आणि श्रेणीनिहाय रिक्त पदांच्या संख्येच्या आधारे पात्र उमेदवारांची गुणानुक्रमे गुणवत्ता यादी तयार करण्यात आली. सामाजिक आणि समांतर आरक्षणाचा विचार करून १५ संवर्गांची गुणवत्ता यादी, निवडसूची आणि प्रतीक्षायादी बुधवारी प्रसिद्ध करण्यात आली.

यामध्ये कनिष्ठ अभियंता (बायोमेडिकल इंजिनीअर) सहा, उद्यान अधीक्षक एक, सहाय्यक माहिती व जनसंपर्क अधिकारी एक, सांख्यिकी सहाय्यक तीन, ईसीजी तंत्रज्ञ आठ, सीएसएसडी तंत्रज्ञ पाच, आहार तंत्रज्ञ एक, नेत्र चिकित्सा सहाय्यक एक, आरोग्य सहाय्यक (महिला) १२, पशुधन पर्यवेक्षक दोन, ध्वनीचालक एक, लेखा लिपिक ५८, शवविच्छेदन मदतनीस चार, कक्षसेविका/आया २८ आणि कक्षसेवक २९ पदांचा समावेश आहे.

निवडसूचीत नावाचा समावेश झाला म्हणजे संबंधित उमेदवाराची नियुक्ती निश्चित झाली, असा अर्थ नसल्याचे महापालिकेने स्पष्ट केले आहे. निवडसूचीतील उमेदवारांनी कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर केलेल्या जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, नॉन-क्रीमीलेअर तसेच खेळाडू, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, माजी सैनिक, अंशकालीन, दिव्यांग आणि अनाथ या समांतर आरक्षणाशी संबंधित प्रमाणपत्रांची पडताळणी केली जाणार आहे.

उमेदवाराने सादर केलेली माहिती चुकीची किंवा खोटी आढळल्यास, आरक्षणाशी संबंधित प्रमाणपत्र सक्षम प्राधिकाऱ्याकडून अवैध ठरल्यास किंवा संबंधित उमेदवार अन्य आवश्यक पात्रता पूर्ण करीत नसल्याचे आढळल्यास नियुक्ती दिली जाणार नाही. तसेच नियुक्तीपूर्वी आवश्यक वैद्यकीय तपासणीही करण्यात येणार आहे.

दिव्यांग उमेदवारांच्या बाबतीत नियुक्तीपूर्वी वैद्यकीय मंडळाकडून तपासणी करण्यात येणार आहे. संबंधित पदासाठी उमेदवार सक्षम नसल्याचे आढळल्यास किंवा दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान ४० टक्यांपेक्षा कमी असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांचे नाव निवडसूचीतून वगळले जाऊ शकते. त्यामुळे वैद्यकीय तपासणी पूर्ण होईपर्यंत संबंधित दिव्यांग उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात येणार नाहीत.

निवडसूचीतील उमेदवारांच्या कागदपत्र पडताळणीचे वेळापत्रक नवी मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर स्वतंत्रपणे प्रसिद्ध केले जाणार आहे. त्यामुळे उमेदवारांनी http://www.nmmc.gov.in या संकेतस्थळावरील सूचनांचे वेळोवेळी अवलोकन करण्याचे आवाहन महापालिकेने केले आहे. कागदपत्र पडताळणी आणि निवड समितीच्या मान्यतेनंतर पात्र उमेदवारांना नियुक्ती देण्याबाबतची पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

# नवी मुंबईतून ७०० भाविक वैष्णोदेवींच्या दर्शनाला रवाना ; १६ वर्षांची परंपरा



**नवी मुंबई : बातमीदार**

नवरात्रोत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असून, देवीच्या आगमनाची आणि दर्शनाची भक्तांना आतुरता लागली आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही नवी मुंबईतील विविध गावांमधील भाविकांनी नवरात्रोत्सवाच्या पहिल्याच दिवशी वैष्णोदेवी मातेचे दर्शन घेण्याचा संकल्प केला आहे. त्यासाठी दिवाळे कोळीवाडा, बेलापूर, करावे, दारावे, नेरुळ, सानपाडा, तुर्भे, वाशी, कोपरखैरणे आणि घणसोली परिसरातील भाविक गुरुवार, दि. ८ रोजी वैष्णोदेवीच्या भक्तिमय प्रवासाला मार्गस्थ झाले.

बांद्रा टर्मिनस येथून स्वराज एक्सप्रेसने या भाविकांनी वैष्णोदेवीकडे प्रस्थान केले. प्रवासाला सुरुवात होताच 'जय माता दी', 'माता राणी की जय' अशा जयघोषाने संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले. हातात देवीचा ध्वज, मुखी देवीचे नामस्मरण आणि मनात मातेच्या दर्शनाची आस घेऊन सुमारे ६०० ते ७०० भाविकांचा हा समूह मोठ्या उत्साहात रवाना झाला.

यावेळी, नवरात्रोत्सवाच्या पहिल्याच दिवशी वैष्णोदेवी मातेच्या चरणी नतमस्तक होऊन कुटुंबाच्या सुख-समृद्धीसह आरोग्य, समाधान आणि सर्वांच्या मंगलमय जीवनासाठी प्रार्थना करण्याची परंपरा या भाविकांनी जपली आहे. अनेक कुटुंबे, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि तरुणांचा या भक्तिमय यात्रेत सहभाग असून, अनेकांसाठी ही यात्रा श्रद्धा, परंपरा आणि भावनिक नाते जपणारा वार्षिक सोहळाच ठरतो.

दरम्यान, नवी मुंबईतील विविध गावांमधून एकत्र आलेल्या या भाविकांमुळे 'एक गाव, एक श्रद्धा आणि एक भक्तिभाव' अशी अनुभूती या यात्रेत पाहायला मिळत आहे. या भक्तिमय यात्रेचे यंदा १६वे वर्ष असून, नवरात्राच्या मंगलमय पर्वाची सुरुवात वैष्णोदेवी मातेच्या दर्शनाने करण्याची ही भक्तिमय परंपरा दरवर्षी अधिक उत्साहाने पुढे नेली जात आहे,

# एमएनएम विद्यालयातील विद्यार्थ्यांची न्हावा मरीन म्युझियम येथे क्षेत्रभेट

**न्हावा : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या एम.एन.एम. विद्यालय व टी.एन.जी. कनिष्ठ विज्ञान विद्यालयाच्या इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांसाठी न्हावा येथील मरीन म्युझियम येथे शैक्षणिक क्षेत्रभेटीचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना सागरी वारसा, जहाजबांधणी, भारतीय शिपिंगचा इतिहास तसेच सागरी पर्यावरणाची प्रत्यक्ष माहिती मिळावी, हा या क्षेत्रभेटीमागील प्रमुख उद्देश होता.

या क्षेत्रभेटीदरम्यान म्युझियमच्या क्युरेटर जोशना मॅडम यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत करून संग्रहालयाची निर्मिती, टी.एस. रहमान संस्थेची उभारणी व तिचा इतिहास याविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली. तसेच सर मोहम्मद युसूफ यांनी १९१२ मध्ये स्थापन केलेल्या मरीन म्युझियमच्या ऐतिहासिक वाटचालीची माहितीही त्यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितली.




म्युझियममध्ये एकूण १३ गॅलरी असून त्यामध्ये भारतीय सागरी वारशाचे विविध पैलू जतन करण्यात आले आहेत. हेरिटेज गॅलरी, ब्रिटिश व मराठा गॅलरी, वाडिया गॅलरी, कंट्री क्राफ्ट बोट डिस्प्ले, इकोलॉजी गॅलरी, बॉम्बे स्टीम नेव्हिगेशन गॅलरी, टी.एस. रहमान गॅलरी, सर मोहम्मद युसूफ गॅलरी, सिंधिया गॅलरी आदी दालनांमधून भारतीय शिपिंग क्षेत्राचा समृद्ध इतिहास आणि वारसा विद्यार्थ्यांनी जाणून घेतला.

विद्यार्थ्यांनी जहाजबांधणीची प्रक्रिया, सौर ऊर्जा प्रकल्प, जेट्टी, उद्यान तसेच टी.एस. रहमान शैक्षणिक संकुलाचा परिसर प्रत्यक्ष पाहिला. या क्षेत्रभेटीमुळे विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकातील ज्ञानासोबतच प्रत्यक्ष अनुभवातून सागरी इतिहास व पर्यावरणाची माहिती मिळाली. या अनोख्या शैक्षणिक अनुभवाबद्दल विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त केला.

ही क्षेत्रभेट प्राचार्या सौ. सायली वडवलकर मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे पार पडली. इयत्ता नववीच्या वर्गशिक्षिका वंदना जाधव मॅडम, अस्मिता वाघमारे मॅडम आणि जयश्री देशपांडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच अविनाश कजबजे यांनी क्षेत्रभेटीच्या नियोजनात व आयोजनात विशेष परिश्रम घेत सहभाग नोंदवला.या क्षेत्रभेटीमुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडून त्यांना भारतीय सागरी वारसा, शिपिंग क्षेत्र आणि पर्यावरण यांचा जवळून परिचय झाला.

# सफाई कामगारांच्या योजना प्रभावीपणे राबवा

## आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग डागोर यांचे निर्देश; विविध योजनांचा घेतला आढावा

**रायगड : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य सफाई कामगार आयोगाचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) शेरसिंग डागोर यांनी ६ व ७ ऑक्टोबर रोजी रायगड जिल्ह्याला भेट दिली. या भेटीदरम्यान ७ ऑक्टोबर रोजी त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये सफाई कामगारांसाठी राबवण्यात येत असलेल्या विविध शासकीय योजनांच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावा घेतला.

या आढावा बैठकीस जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, सहाय्यक आयुक्त (समाज कल्याण) सुनील जाधव, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.शीतल जोशी, पोलीस उपअधीक्षक (गृह),जिल्हा समाज कल्याण अधिकारी (जि.प.) तसेच जिल्ह्यातील सर्व नगरपालिका व नगरपंचायतींचे मुख्याधिकारी यांच्यासह जिल्ह्यातील प्रमुख यंत्रणांचे अधिकारी उपस्थित होते.




आढावा बैठकीमध्ये उपस्थितांना संबोधित करताना अध्यक्ष शेरसिंग डागोर यांनी प्रचलित शासन निर्णय व परिपत्रकांच्या अनुषंगाने सफाई कामगार आणि त्यांच्या कुटुंबियांना शासकीय योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळण्यासाठी प्रशासनाने नेहमी प्रयत्नशील राहावे, असे आवाहन केले.

लाड-पागे समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने सफाई कामगारांच्या वारसांना वारसाहक्काने नियुक्ती देण्याबाबत सफाई कामगार व त्यांच्या कुटुंबियांमध्ये जाणीवजागृती करणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच, वारसाहक्काने नियुक्ती मिळण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याबाबत संबंधित यंत्रणेने स्वतः पुढाकार घेऊन सफाई कामगारांकडून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून घेण्यासाठी सर्वतोपरी साहाय्य करावे, असे निर्देश त्यांनी दिले.

सफाई कामगार व त्यांच्या कुटुंबियांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजना, रमाई आवास योजना आणि आरोग्य सुविधांसाठी राबवण्यात येत असलेल्या विविध योजनांचा सुलभतेने लाभ घेता यावा यासाठी त्यांचे वेळोवेळी प्रबोधन करण्यात यावे, असे मत अध्यक्षांनी व्यक्त केले. याचबरोबर सफाई कामगारांना संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत नमस्ते भारत या योजनेखाली सुरक्षा किट तातडीने पुरवण्यात यावेत, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

अस्वच्छ व्यवसायात काम करणाऱ्या पालकांच्या इयत्ता १ली ते १०वीच्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या पाल्यांसाठी समाज कल्याण विभागामार्फत शिष्यवृत्ती योजना राबवली जाते. या योजनेचा तसेच इतर शैक्षणिक योजनांचा लाभ घेण्यासाठी तालुकास्तरावर विशेष शिबिरांचे आयोजन करून व्यापक जनजागृती करण्यात यावी, असे निर्देश अध्यक्षांनी उपस्थित अधिकाऱ्यांना दिले.

बैठकीचा समारोप करताना अध्यक्ष शेरसिंग डागोर यांनी सांगितले की, सफाई कामगार हा समाजातील अत्यंत दुर्लक्षित आणि अशिक्षित वर्ग आहे. त्यामुळे त्यांच्या उन्नतीसाठी शासनाकडून राबवण्यात येत असलेल्या अनेक चांगल्या योजनांपासून ते अनभिज्ञ राहतात व माहितीअभावी या योजनांचा लाभ घेऊ शकत नाहीत. ही परिस्थिती बदलण्यासाठी वर्तमानपत्रे, सोशल मीडिया व अन्य हक्काच्या प्रसारमाध्यमांचा प्रभावी वापर करून योजनांची माहिती थेट सफाई कामगारांपर्यंत पोहचवावी, असे आवाहन केले.

# बोर्ली नाका येथील मुख्य रस्त्यावर पाण्याची गळती

## पाणी जातेय वाया; उपाययोजनेची मागणी

**रेवदंडा : प्रतिनिधी**

बोर्ली नाका येथील मुख्य रस्त्यावर गेल्या अनेक महिन्यांपासून पाण्याची सतत गळती सुरू असून दररोज पाणी वाहून वाया जात आहे. विशेष म्हणजे परिसरात उन्हाळ्यात दरवर्षी पाणीटंचाईची समस्या निर्माण होत असताना संबंधित यंत्रणेकडून या गळतीकडे दुर्लक्ष होत असल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.



बोर्ली नाक्याजवळील मुख्य रस्त्याचे सुमारे दोन वर्षांपूर्वी काँक्रीटीकरण करून नूतनीकरण करण्यात आले, मात्र काँक्रीटच्या रस्त्याच्या मध्यभागातून सातत्याने पाणी वाहत असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे. हे पाणी नेमके कोणत्या जलवाहिनीतून अथवा पाईपमधून गळत आहे याबाबत अद्याप स्पष्टता नाही. फणसाड धरणाच्या मुख्य जलवाहिनीत बिघाड झाला आहे की, एखाद्या घरगुती नळजोडणीतून पाणी गळत आहे याची तपासणी होणे गरजेचे आहे.

सतत वाहणाऱ्या या पाण्यामुळे रस्त्यावर चिखल व पाणी साचत असून परिसरातील दुकानदार तसेच वाहनचालक आणि पादचाऱ्यांना त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्याच्या काँक्रीटमध्येही पाण्यामुळे झीज होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

बोर्ली परिसराला पाणीपुरवठा करणाऱ्या फणसाड धरणाची पाणीपातळी उन्हाळ्यात कमी झाल्यानंतर पंचक्रोशीत दरवर्षी पाणीटंचाई जाणवते. अशा परिस्थितीत मुख्य रस्त्यावर महिनोन् महिने पाणी वाया जाणे ही गंभीर बाब आहे. स्थानिक ग्रामस्थ, समाजसेवक तसेच ग्रामपंचायतीने याकडे तातडीने लक्ष देऊन पाण्याची गळती शोधून ती कायमस्वरूपी बंद करावी, अशी मागणी होत आहे.

# हरिहरेश्वर बीट पोलीस चौकीचे उद्घाटन

**श्रीवर्धन : बातमीदार**

हरिहरेश्वर येथे असलेली बीट पोलीस चौकी नव्याने बांधण्यात आली असून या संपूर्ण चौकीचे काम लोकसहभागातून करण्यात आले आहे. यासाठी अनेक नागरिकांनी व भाविकांनी सहकार्य केले आहे. रायगडच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या हस्ते पोलीस चौकीचे उद्घाटन व नामफलकाचे अनावरण करण्यात आले.



यानंतर श्रीक्षेत्र हरिहरेश्वर देवस्थानच्या सभामंडपामध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. श्रीवर्धनचे उपविभागीय पोलीस अधिकारी राज सोनावणे यांनी दलाल मॅडम यांचे स्वागत केले. प्रास्ताविक श्रीवर्धन पोलीस ठाण्याचे निरीक्षक सुरेंद्र गरड यांनी केले. यावेळी पोलीस चौकी उभारण्यासाठी अनेक नागरिकांचे सहकार्य लाभले होते त्यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे फ्लाईंग बर्डस रेस्क्यू टीम, हरिहरेश्वर रेस्क्यू टीम व अन्य एका स्थानिक रेस्क्यू टीमचादेखील सत्कार करण्यात आला. यावेळी पत्रकारांच्या वतीने ज्येष्ठ पत्रकार संतोष चौकर यांनी सत्कार स्वीकारला.

सरपंच अमित खोत यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. संतोष सापते यांनी केले, तर आभार दिघी सागरी पोलीस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक संतोष आवटी यांनी केले.

# उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या शेतकऱ्यांचा सत्कार

**मुरूड : प्रतिनिधी**

भातशेती व फळ लागवड रायगड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात व्हावी. जुन्या लोकांबरोबरच नवीन पिढीनेसुद्धा शेतीमध्ये लक्ष केंद्रित करावे यासाठी रायगड जिल्हा परिषदेमार्फत शेती क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शेतकऱ्यांचा शेताच्या बांधावर जाऊन सत्कार करण्यात येतो. मुरूड तालुक्यामधील शेती क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शेतकऱ्यांचा सत्कार जिल्हा परिषद सदस्य ज्योती नागावकर यांच्या हस्ते करण्यात आला.



रायगड जिल्हा परिषदेमार्फत कृषी क्षेत्रात उल्लेखनीय व प्रगतिशील कार्य करणाऱ्या शेतकरी रेश्मा मिसाळ, क्लेमेंट मार्टिस आणि डॉमनिक रुजारियो यांचा हस्ते विशेष सन्मान करण्यात आला. सत्कारमूर्ती शेतकऱ्यांना शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

यावेळी जि.प. सदस्य ज्योती नागावकर यांनी सांगितले की, देशाचा अन्नदाता हा शेतकरी आहे. तो दिवसभर काबाडकष्ट करून शेतामध्ये अन्न तयार करतो. त्यामध्ये त्यांना अनेक संकटाना तोंड द्यावे लागते. तरीही हिंमत न हरता ते शेती करतात ही एक वाखाणण्यासारखी बाब असून त्यांचे कौतुक हे त्यांच्या घरी जाऊन करण्याची मला संधी मिळाली याचा आनंद होत आहे.

या कार्यक्रमास जिल्हा कृषी विकास अधिकारी पवनकुमार नजन, तालुका कृषी अधिकारी वसंत दळवी, मुरूडपंचायत समितीचे माजी सभापती रमेश नागावकर, शिवसेना उपतालुका प्रमुख भागीरथ पाटील, कोर्लई ग्रामपंचायत सरपंच राजश्री मिसाळ, बोर्ली ग्रामपंचायत सरपंच सपना जावसेन तसेच कृषी विभागाचे अधिकारी, कर्मचारी व स्थानिक नागरिक उपस्थित होते.

# 'ऑनलाइन व्यवहार करताना सावधगिरी बाळगावी'

**कर्जत : प्रतिनिधी**

विद्यार्थिनींनी शक्यतो आपला फोटो आपल्या मोबाईलमध्ये काढू नये. त्याचा गैरफायदा घेऊन पुढे खूप अडचणी येऊ शकतात. बँकेच्या किंवा अन्य महत्वाच्या कामांसाठी वेगळा मोबाईल नंबर व साधा मोबाईल वापरल्यास अधिक सुरक्षित होऊ शकते तसेच आपली वैयक्तिक माहिती, ओटीपी, संकेतशब्द अथवा बँकिंगविषयक माहिती कोणत्याही अनोळखी व्यक्तीसोबत शेअर करू नये. ऑनलाइन आर्थिक व्यवहार करताना विशेष सावधगिरी बाळगावी, असा सल्ला सहाय्यक पोलीस निरीक्षक मनिषा लटपटे यांनी विद्यार्थ्यांना दिला.



कोकण ज्ञानपीठ राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयात विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षा आणि ऑनलाइन फसवणुकीबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने सायबर सुरक्षा जनजागृती व्याख्यानाचे आयोजन सेमिनार हॉलमध्ये करण्यात आले होते. त्यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक लटपटे मार्गदर्शन करीत होत्या.

या सेमिनारला महाविद्यालयीन विकास समिती सदस्य विजय मांडे, उपप्राचार्य डॉ. अमोल चांदेकर, पोलीस शिपाई चंद्रकांत रावते, विठ्ठल घावस, डॉ. निलोफर खान आदी उपस्थित होते. डॉ. चांदेकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. मांडे यांनी प्रस्ताविकात उपक्रमाचा उद्देश सांगितला.

चंद्रकांत रावते आणि पोलीस विठ्ठल घावस यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन केले. त्यांनी सायबर फसवणूक, ओटीपी व संकेतशब्दांची सुरक्षितता, समाजमाध्यमांचा वापर करताना घ्यावयाची काळजी, अनोळखी संकेतस्थळांच्या किंवा संदेशांच्या दुव्यांवर क्लिक न करणे, डिजिटल आर्थिक व्यवहारांमधील फसवणूक, बनावट नोकरीच्या माध्यमातून होणारी फसवणूक तसेच एपीके फाइलद्वारे होणारे सायबर गुन्हे याबाबत सविस्तर माहिती दिली. डॉ. चांदेकर यांनी महाविद्यालयाच्या वतीने भविष्यातही अशा जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगितले. सूत्रसंचालन श्वेता कर्वे आणि सुष्मिता मजली यांनी केले. सुनील पंडित, पूजा धनगर, प्रकृती सिंग, विजय जिनगरे आदी उपस्थित होते.

# राजाश्रय संस्थेला साहित्य सुपूर्द

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मोहोपाडा येथील कै. नरसम्मा सायलू गुडसे यांच्या स्मरणार्थ मंगळवार गुडसे कुटुंबीयांच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत खाने आंबिवली येथील राजाश्रय या संस्थेला विविध साहित्याची मदत सुपूर्द करण्यात आली.

गुडसे कुटुंबातील नरसिंह गुडसे, मलेश गुडसे, जयश्री गुडसे, ज्योती गुडसे व समस्त गुडसे कुटुंबीयांच्या वतीने ताट (भोजन पात्रांचे संच) तसेच किराणा माल संस्थेला देण्यात आला. कै. नरसम्मा सायलू गुडसे यांच्या स्मृती जपत समाजातील गरजू घटकांना मदतीचा हात देण्याची परंपरा कायम ठेवत गुडसे कुटुंबीयांनी सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न केला आहे.

# राजाराम जाधव शिक्षक परिषद खालापूर तालुका अध्यक्षपदी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद, शाखा खालापूर तालुकाध्यक्षपदी जिल्हा परिषद शाळा कलोते रयतीचे मुख्याध्यापक राजाराम भगवान जाधव यांची बिनविरोध निवड करण्यात आली. खालापूर येथे झालेल्या बैठकीत नूतन तालुका कार्यकारिणीची निवड करण्यात आली.



राजाराम जाधव यांनी १९ जून १९९५ रोजी रायगड जिल्हा परिषद शाळा वाजापूर, पनवेल येथे शिक्षक म्हणून आपल्या सेवेला सुरुवात केली. या शाळेत त्यांनी तीन वर्षे अध्यापनाचे कार्य केले. त्यानंतर खालापूर, माजगाव, धामणी, कुंभिवली आणि वडवल येथील जिल्हा परिषद शाळांमध्ये त्यांनी विद्यार्थ्यांना ज्ञानदान केले. सध्या ते जिल्हा परिषद शाळा कलोते रयती येथे मुख्याध्यापक म्हणून कार्यरत आहेत.

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद, खालापूर तालुका शाखेच्या नूतन कार्यकारिणीत कार्यवाहपदी डॉ. अजय देशमुख, कार्याध्यक्ष अमसिद्ध बिराजदार, कोषाध्यक्ष भारत आढे, संघटनमंत्री प्रदीप चव्हाण आणि तालुका महिला आघाडी प्रमुख रेखा जाधव यांचीही बिनविरोध निवड करण्यात आली.

या निवड प्रक्रियेसाठी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे राज्याध्यक्ष राजेश सुर्वे, जिल्हाध्यक्ष उदय गायकवाड, जिल्हा कार्यवाह विजय पवार, राज्य प्रसिद्धीप्रमुख वैभव कांबळे, निरीक्षक तथा जिल्हा उपाध्यक्ष राजेंद्र खामकर आणि महेंद्र पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

# उतेखोल आश्रमशाळेत वारली पेंटिंग कार्यशाळा

## अनिल वाघमारे यांच्याकडून मार्गदर्शन; विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**माणगाव : प्रतिनिधी**

वनवासी कल्याण आश्रम महाराष्ट्र संचलित कै. सौ. विजया गोपाळ गांधी अनुदानित प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, उतेखोल-माणगाव येथे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी वारली पेंटिंग कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन पोस्को कंपनीचे सीएसआर प्रमुख कुलदीप पुरंदरे यांच्या हस्ते झाले.

शाळेत दरवर्षी विद्यार्थ्यांकडून दिवाळीनिमित्त पोस्टकार्डवर आकर्षक चित्रे काढून शाळेत येणारे पाहुणे, हितचिंतक तसेच समाजातील देणगीदारांना दिवाळीच्या शुभेच्छा देण्यासाठी भेटकार्ड पाठविले जातात. समाज आपल्याला मदत करतो, त्यामुळे आपणही समाजाला काहीतरी देणे लागतो या सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून हा उपक्रम राबविला जातो. यावर्षी नेहमीपेक्षा वेगळ्या पद्धतीने पोस्टकार्ड तयार करण्यासाठी विद्यार्थ्यांना वारली चित्रकलेचे प्रशिक्षण



देण्याचा निर्णय घेण्यात आला.

कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना कुलदीप पुरंदरे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच विविध कलागुणांची जोपासना केली पाहिजे. कला, कौशल्ये आणि नवीन तंत्रज्ञानाचे ज्ञान आत्मसात केले तरच भविष्यातील स्पर्धेत आपण टिकू शकतो. समाज आपल्याला नेहमी काही ना काही देत असतो; त्याचप्रमाणे आपणही समाजाला काहीतरी दिले पाहिजे.

वारली चित्रकलेचे प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षक अनिल वाघमारे, पनवेल तसेच शाळेचे माजी विद्यार्थी मंगेश पवार, कर्जत हे उपस्थित होते. वाघमारे यांनी आतापर्यंत सुमारे आठ हजार विद्यार्थ्यांना वारली पेंटिंगचे प्रशिक्षण दिले असून कार्यशाळेदरम्यान त्यांनी विद्यार्थ्यांना वारली कलेचा इतिहास, वैशिष्ट्ये, चित्र काढण्याची पद्धत तसेच त्यामागील सांस्कृतिक संदर्भ यांची माहिती दिली.

### १,००० पोस्टकार्ड तयार करण्याचे उद्दिष्ट

कार्यशाळेनंतर विद्यार्थ्यांनी पुढील आठ दिवसांत तब्बल एक हजार वारली पेंटिंग असलेली दिवाळी शुभेच्छा पोस्टकार्ड तयार करण्याचे नियोजन केले आहे. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देतानाच समाजाशी असलेले ऋणानुबंध जपण्याचा हा उपक्रम सामाजिक बांधिलकी आणि सर्जनशील शिक्षणाचा सुंदर संगम ठरत आहे.

कार्यशाळेच्या उद्घाटन कार्यक्रमास माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक उत्तम पाटील व प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक अरुण पाटील उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून कला आणि शिक्षण यांचा समतोल साधण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आश्रमशाळेच्या अधीक्षिका मीनाक्षी कांबळे यांनी केले.

वारली पेंटिंग कार्यशाळा घेण्याची संकल्पना वनवासी कल्याण आश्रम कोकण प्रांताचे संघटनमंत्री प्रदीप पाटील यांनी सुचविली होती. या कार्यशाळेत २५ मुले व २५ मुली अशा एकूण ५० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. सकाळी १० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत चाललेल्या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी अतिशय उत्साहाने विविध वारली चित्रे साकारली. विद्यार्थ्यांनी तयार केलेली पोस्टकार्ड पाहून संस्थेचे सहसचिव रवींद्र पाटील व नितीन चांदोरकर यांनी विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले.

# वाचन एक उत्तम छंद, प्रत्येकाने तो जोपासावा -डॉ. संतोष मोरे



**माणगाव : प्रतिनिधी**

वाचणे हा एक उत्तम छंद आहे. वाचनाने माणूस ज्ञानी होतो आणि त्याला पुस्तकाच्या रूपाने एक नवीन मित्र मिळतो. वाचन माणसाला माणूस बनविते, जीवनाला एक नवी दिशा देते, विचार करायला शिकविते, अंतर्मुख करविते, त्याचप्रमाणे जीवनात योग्य-अयोग्य काय याची जाणीव करून देत असल्याचे मत डॉ. संतोष मोरे यांनी मांडले.

माध्यमिक आश्रम शाळा उतेखोल येथे वाचन संस्कृतीचे महत्त्व या विषयावर मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी डॉ. संतोष मोरे बोलत होते. कार्यक्रमास माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक उत्तम पाटील, प्राथमिक चे मुख्याध्यापक अरुण पाटील, किरण मोरे, मयुरी भगत, अंकुश काळे, प्रवीण पाटील आदी शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

आपल्या समाजात 'वाचाल तर वाचाल' अशी म्हण प्रचलित आहे. वाचनामुळे मानवाच्या व्यक्तिमत्वाचा अंतर्बाह्य विकास होतो, ज्ञानात भर पडते, आजूबाजूच्या जगातील माहिती होते, असे डॉ. मोरे यांनी सांगितले.

# न्यूझीलंड दौऱ्यासाठी भारताचे दोन वनडे संघ?



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत विरुद्ध न्यूझीलंड यांच्यातील पाच सामन्यांची वनडे मालिका ४ नोव्हेंबरपासून सुरू होणार आहे. २०२७च्या वनडे विश्वचषकाच्या तयारीच्या दृष्टीने टीम इंडियासाठी ही मालिका अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. विशेष म्हणजे, या वनडे मालिकेनंतर भारत न्यूझीलंडविरुद्ध कसोटी मालिकाही खेळणार आहे. त्यामुळे खेळाडूंवरील कामाचा ताण आणि त्यांना विश्रांतीची गरज लक्षात घेता निवड समिति वनडे मालिकेसाठी दोन स्वतंत्र संघ निवडण्याची शक्यता आहे.

पहिला वनडे सामना ४ नोव्हेंबरला होणार आहे, तर पाचवा आणि अंतिम सामना १५ नोव्हेंबरला खेळवला जाईल. त्यानंतर अवघ्या चार दिवसांनी पहिली कसोटी सुरू होईल. त्यामुळे कसोटी संघातील नियमित खेळाडूंना मालिकेतील शेवटच्या दोन वनडे सामन्यांसाठी विश्रांती दिली जाऊ शकते.

टीम इंडिया पहिल्या तीन वनडे सामन्यांसाठी आपल्या प्रमुख खेळाडूंना मैदानात उतरवण्याची शक्यता आहे, मात्र शेवटच्या दोन सामन्यांसाठी संघात मोठे बदल केले जाऊ शकतात. शुबमन गिल, यशस्वी जयस्वाल, केएल राहुल, नितीश कुमार रेड्डी, वॉशिंग्टन सुंदर आणि जसप्रीत बुमराह यांसारख्या कसोटी संघातील खेळाडूंना विश्रांती दिली जाऊ शकते. जर या खेळाडूंना विश्रांती दिली गेली, तर इशान किशन, श्रेयस अय्यर आणि ऋतुराज गायकवाड यांना प्लेइंग ११ खेळाडूंच्या संघात स्थान मिळण्याची शक्यता आहे.

दरम्यान, निवड समिती सध्या सुरू असलेल्या 'भारत अ विरुद्ध ऑस्ट्रेलिया अ' मालिकेवरही बारीक लक्ष ठेवून आहे. वृत्तानुसार या मालिकेतील कामगिरीच्या आधारे तीन ते चार खेळाडूंना न्यूझीलंडविरुद्धच्या वनडे संघात बोलावले जाऊ शकते. भारत 'अ' संघाचा कर्णधार ऋतुराज गायकवाड याला शेवटच्या दोन वनडे सामन्यांसाठी संधी मिळण्याची शक्यता आहे. निवडीसाठी आपला दावा मजबूत करण्यासाठी यश ठाकूर, सूर्यांश शेडगे आणि प्रभसिमरन सिंग यांनाही चांगली कामगिरी करावी लागेल.

**विश्वचषकापूर्वी खेळाडूंची चाचपणी**

२०२७च्या वनडे विश्वचषकापूर्वी भारताला वनडे मालिका खेळण्याच्या फार कमी संधी मिळणार आहेत. त्यामुळे प्रत्येक मालिकेत खेळाडूंची चाचणी घेणे अत्यंत महत्त्वाचे ठरेल. भारताला विशेषतः वेगवान गोलंदाजांच्या बाबतीत पर्याय तयार करण्याची गरज आहे. निवड समिती अशा दोन तरुण वेगवान गोलंदाजांच्या शोधात आहे, जे विश्वचषकादरम्यान वरिष्ठ खेळाडूंना दुखापत झाल्यास त्यांची जागा घेऊ शकतील.



## गव्हाण विद्यालयाचा खो-खो संघ विजेता

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सेंट विल्फ्रेड स्कूल, शेडुंग, पनवेल येथे आयोजित करण्यात आलेल्या पनवेल तालुकास्तरीय खो-खो स्पर्धेत रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज, गव्हाण-कोपरच्या १७ वर्षांखालील मुलांच्या संघाने दमदार कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला.

अंतिम सामन्यात गव्हाण विद्यालयाच्या संघाने चावणे स्कूलच्या संघाचा पराभव करत विजेतेपदावर आपले नाव कोरले. विजयी संघाची आता जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

विजेत्या संघाचे प्राचार्य ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलास लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रवींद्र भोईर, लाइफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख प्रा. संजय उगले तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले. क्रीडा शिक्षक सुरेश पारखे यांचेही जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

## टी-२० क्रमवारीत श्रेयस अय्यरची मुसंडी



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयसीसीच्या वनडे क्रमवारीत बरीच उलथापालथ झाल्याचे पाहायला मिळत आहे. विराट कोहलीची दुसऱ्या स्थानावरून तिसऱ्या स्थानावर घसरण झाली आहे. दुसरीकडे टी-२० क्रमवारीत श्रेयस अय्यरने मोठी झेप घेतली आहे. एशियन गेम्स स्पर्धेतील कामगिरीनंतर त्याला फायदा झाला आहे. त्याने एका झटक्यात १८ खेळाडूंना मागे टाकले आहे.

वनडे क्रमवारीत भारतीय कर्णधार शुबमन गिलचा डंका वाजला आहे. मागच्या आठवड्यात शतकी खेळीनंतर द्विशतकी खेळीही त्याच्या पथ्यावर पडली आहे. त्यामुळे गिल ८४१ रेटिंग पॉइंटसह पहिल्या स्थानावर आहे, तर मागच्या आठवड्यात तिसऱ्या क्रमांकावर असलेल्या न्यूझीलंडच्या डॅरिल मिचेलने एक स्थानाची झेप घेत दुसरे स्थान गाठले आहे.

रोहित शर्माची वनडे रँकिंग कायम आहे. रोहित ७७० रेटिंग पॉइंटसह चौथ्या स्थानावर आहे. आयसीसीच्या ताज्या क्रमवारीनुसार भारताचे चार फलंदाज टॉप १०मध्ये आहेत. त्यापैकी तीन फलंदाज हे टॉप ५मध्ये आहेत, तर केएल राहुलची टॉप १०मध्ये एन्ट्री झाली आहे. राहुल शतकी खेळीनंतर ११व्या स्थानावरून १०व्या स्थानी विराजमान झाला आहे.

## किरोन पोलार्ड बनला 'सुपर किंग्स' फॅमिलीचा भाग

**चेन्नई : वृत्तसंस्था**

वेस्ट इंडिजचा अष्टपैलू दिग्गज फलंदाज किरोन पोलार्ड अखेर प्रथमच 'सुपर किंग्स' फॅमिलीचा भाग बनला आहे. दक्षिण आफ्रिका टी-२० लीगच्या आगामी पाचव्या हंगामासाठी बुधवारी पार पडलेल्या खेळाडूंच्या लिलावात जोबर्ग सुपर किंग्सने त्याला १.५ मिलियन रँड (सुमारे ८७ लाख रुपये) देऊन आपल्या संघात सहभागी करून घेतले.

दरम्यान, गेल्या १५ वर्षांहून अधिक काळ मुंबई इंडियन्स फॅमिलीचा एक महत्त्वाचा भाग राहिलेल्या पोलार्डने मुंबई इंडियन्स व्यतिरिक्त एमआई केपटाऊन, एमआई एमिरेट्स आणि एमआई न्यूयॉर्क या सिस्टर फ्रँचायझींसाठी खेळाडू व सपोर्ट स्टाफ म्हणून योगदान दिले. २०१०मध्ये वेस्ट इंडिजचाच ड्वेन ब्राव्हो याने चेन्नई सुपर किंग्सला पोलार्डला खरेदी करण्याचा सल्ला दिला, मात्र, तेव्हा मुंबई इंडियन्सने त्याला आपल्या संघात घेतले. आता तब्बल १६ वर्षांनंतर प्रथमच पोलार्ड पिवळ्या जर्सीमध्ये खेळताना दिसणार आहे.



दक्षिण आफ्रिका टी-२० लीगच्या आगामी लिलावात दक्षिण आफ्रिकेचा १९ वर्षांखालील अष्टपैलू खेळाडू जेसन रोल्स हा सर्वात महागडा खेळाडू ठरला. त्यालाही जोबर्ग सुपर किंग्सने २.९ मिलियन रँड देऊन खरेदी केले. याशिवाय फाफ डु प्लेसिसची २.७ मिलियन रँडमध्ये संघात पुनरागमन झाले. जोबर्ग सुपर किंग्सने दयान गलीम, ब्लेसिंग मुझरबानी आणि अँड्रीस गॉस यांनाही आपल्या ताफ्यात समाविष्ट केले.

दुसरीकडे एमआय केपटाऊनने पोलार्डवर पुन्हा बोली न लावता शिमरॉन हेटमायर, वियान मुल्डर, ट्रेंट बोल्ट, डॅनिएल स्मिथ, लेहान बोथा आणि ऑलिव्हर व्हाईटहेड यांना संघात स्थान दिले.

२००६पासून टी-२० क्रिकेटमध्ये सक्रिय असणाऱ्या किरोन पोलार्डकडे तब्बल २० वर्षांचा अनुभव आहे. या फॉरमॅटमध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत तो दुसऱ्या स्थानावर असून त्याने आतापर्यंत १४ हजार ९९९ धावा केल्या आहेत. अव्वल स्थानासाठी सध्या त्याच्यात आणि जोस बटलरमध्ये चुरस आहे.

## संस्कृती कोकरे उंच उडीत सरस

**माणगाव : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील वरदायिनी विद्यालय महागाव येथील संस्कृती लक्ष्मण कोकरे (इ.७वी) हिने रसायनी येथे झालेल्या जिल्हास्तरीय स्पर्धेत उंच उडी स्पर्धेत यश मिळविले. यामुळे तिची विभागीय स्तरासाठी निवड झाली.

वरदायिनी विद्यालयातून संस्कृती व्यतिरिक्त रोहन पवार उंच उडी, रिषभ माळी व श्रवण रामबाडे थाळीफेक, अश्विनी कोकरे व श्रावणी रामबाडे धावणे, विदिती साबळे उंच उडी अशा एकूण सात विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग घेतला होता. शाळेचे मुख्याध्यापक श्री.व्यवहारे, मार्गदर्शक सौ.मोहिते आणि सर्व शिक्षक, पालक, इंदापूर विभाग शिक्षण प्रसारक मंडळ पदाधिकारी यांनी संस्कृतीचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## श्रीलंकेच्या धनंजया डी सिल्वाने कर्णधारपद सोडले!

**कोलंबो : वृत्तसंस्था**

श्रीलंकेच्या धनंजया डी सिल्वाने तत्काळ प्रभावाने कर्णधारपद सोडले आहे. श्रीलंकन निवड समितीला लिहिलेल्या पत्रात डी सिल्वाने त्यामागचे कारणही स्पष्ट केले असून नेतृत्व सोडल्यावर संघासोबत कायम राहणार असल्याचेही स्पष्ट केले आहे.



धनंजया डी सिल्वा बोर्डाला लिहिलेल्या पत्रात म्हटलंय की, माझ्या मते, कर्णधारपदाची जबाबदारी आता पुढच्या पिढीकडे सोपवली पाहिजे. यापुढेही मी खेळाडू म्हणून श्रीलंकेसाठी खेळण्यासाठी उपलब्ध राहीन. श्रीलंका क्रिकेटचे सीईओ ॲश्ले डी सिल्वा यांनी कसोटी क्रिकेटमधील त्यांच्या योगदानाबद्दल त्यांचे आभार मानले असून उर्वरित कारकिर्दीसाठी त्याला शुभेच्छा दिल्या आहेत.

दिमुथ करुणारत्नेकडून कर्णधारपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर धनंजय डी सिल्वाने १८ कसोटी सामन्यांत श्रीलंकेचे नेतृत्व केले. यापैकी संघाने सात सामने जिंकले, आठ सामन्यांत पराभव पत्करावा लागला, तर तीन सामने अनिर्णित राहिले. कर्णधार म्हणून डी सिल्वाने ३६.४५च्या सरासरीने १,१३० धावा केल्या आणि ४४.४४च्या गोलंदाजीच्या सरासरीने नऊ विकेट्स घेतल्या.




## काकळघर शाळेचे मैदानी क्रीडा स्पर्धेत यश

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी, अलिबाग-रायगड आणि एचओसीएल रसायनी यांच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेत पीएनपी माध्यमिक शाळा, काकळघर-मुरुड येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली.

या स्पर्धेत १४ वर्षांखालील मुलींच्या ४X१०० मीटर रिले संघाने तृतीय क्रमांक पटकावला. याच गटातील मुलींच्या उंच उडी प्रकारात अनुष्का महाडिक हिने तृतीय क्रमांक मिळविला. १७ वर्षांखालील मुलींच्या २०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत आर्या पवार हिने तृतीय क्रमांक प्राप्त केला.

४X१०० मीटर रिले (१७ वर्षांखालील) मुलींचा संघ, ११० मीटर हर्डल्समधील पूर्वी तसेच लाँग जंपमधील अंतरा गौतडे (१७ वर्षे) आणि अनुष्का महाडिक (१४ वर्षे) यांनी उत्कृष्ट कामगिरी करत अंतिम फेरी गाठली. या सर्वांनी अनुक्रमे चतुर्थ क्रमांक मिळविला. काही विद्यार्थिनींनी विनाशूज धावतही अंतिम फेरीपर्यंत मजल मारल्याने त्यांच्या जिद्दीचे व क्रीडाकौशल्याचे उपस्थितांनी विशेष कौतुक केले.

या कामगिरीबद्दल सहाय्यक जिल्हा क्रीडा अधिकारी भक्ती मॅडम तसेच उपस्थित क्रीडाशिक्षकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांना क्रीडाविश्वातून श्रद्धांजली

**मुंबई : प्रतिनिधी**

ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांचे वयाच्या ७५व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनानंतर सर्वच स्तरातून शोक व्यक्त होत आहे. क्रीडाविश्वातूनही त्यांच्या निधनानंतर शोकाकुल प्रतिक्रिया उमटल्या आहेत.

क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर आणि विराट कोहली यांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली आहे. मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर याने नाना पाटेकर यांना श्रद्धांजली वाहताना आठवणींना उजाळा दिला. सचिनने लिहिले की, नाना हे स्पष्ट वक्ते होते आणि जमिनीवर काम करणारे व्यक्त होते. आपले काम ते प्रामाणिकपणे करायचे. मग ते मराठीत असो की हिंदीत; ते जो अभिनय करायचे त्यात जीव ओतायचे. त्यामुळे ते व्यक्तिमत्व खरे वाटायचे. त्यांच्या निधनाची बातमी ऐकून खुप दुःख झाले. त्यांच्या कुटुंबियांना आणि प्रियजनांना प्रती माझ्या संवेदना. ओम शांती!

रनमिशन विराट कोहली यांनीही नाना पाटेकर यांना श्रद्धांजली वाहिली. भारतीय चित्रपटसृष्टीतील महान व्यक्तिमत्व म्हणून त्यांचा उल्लेख केला. विराट कोहलीने पोस्ट करत लिहिले की, नानांचे कार्य आणि त्यांनी मागे ठेवलेला वारसा पिढ्यान्‌पिढ्या स्मरणात राहील. नाना पाटेकरजी. ओम शांती!

नाना पाटेकर यांचे क्रिकेटप्रेम कधी लपले नाही? क्रिकेट सोडावे लागल्याचे त्यांनी



अनेकदा बोलून दाखवले होते. त्यांनी एका कार्यक्रमात सांगितले होते की, माझ्या बोटाला दुखापत झाली आणि त्यामुळे मला क्रिकेट सोडावे लागले, पण हे एक कारण नव्हते. मला काम करून आई-वडिलांना आधार द्यावा लागत होता. त्यामुळेच क्रिकेट सोडले.

**क्रिकेटशी होते खास नाते!**

ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांचे क्रिकेटशी एक विशेष नाते होते. तरुणपणी ते स्वतः क्रिकेट खेळत असत आणि अलीकडच्या काळात ते विराट कोहलीचे मोठे चाहते होते. विराटबद्दल बोलताना नाना एकदा म्हणाले होते, जर विराट कोहली लवकर बाद झाला, तर मला जेवणाचीही इच्छा होत नाही. नानांनी सचिन तेंडुलकर आणि सुनील गावस्कर यांच्याबद्दलही आपली मते मोकळेपणाने मांडली होती. "सचिन तेंडुलकर हा एक उत्कृष्ट फलंदाज आहे, पण सुनील गावसकर हे आमचे नायक आहेत. गावसकरांनी त्यांच्या खेळाद्वारे मला एकाग्रतेचा अर्थ शिकवला. म्हणूनच गावसकर हे माझे आदर्श आहेत," असे त्यांनी म्हटले होते.

**रायफल शुटिंगमध्ये राष्ट्रीय पदक**

वय वाढेल तसा लोकांचा खेळातील रस कमी होतो असे म्हटले जाते, मात्र नाना पाटेकर यांनी वयाच्या उत्तरार्धात राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील नेमबाजी स्पर्धांमध्ये चमकदार कामगिरी केली. २००४मध्ये इंदूर येथील बीएसएफच्या रेवती रेंजवर आयोजित करण्यात आलेल्या ४८व्या राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेत त्यांनी ३०० मीटर बिग-बोर प्रकारात रौप्यपदक पटकावले होते.

## बीसीसीआयकडून व्हीव्हीएस लक्ष्मणवर मोठी जबाबदारी



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

काही दिवसांपूर्वीच अजित आगरकर यांचा मुख्य निवडकर्तेपदाचा कार्यकाळ संपला. त्यानंतर बीसीसीआयने काही मोठे निर्णय घेतले आहेत. निवड समितीचा भाग असलेल्या प्रज्ञान ओझाची कार्यवाहक मुख्य निवडकर्ता म्हणून निवड करण्यात आली आहे. दरम्यान, बीसीसीआयने व्हीव्हीएस लक्ष्मणवर मोठी जबाबदारी सोपवली आहे.

बीसीसीआयचे सचिव देवजीत सैकिया यांनी घोषणा केली की, व्हीव्हीएस लक्ष्मण इथून पुढे निवड समितीच्या प्रत्येक मीटिंगला हजेरी लावणार आहेत. राहुल द्रविड भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक बनल्यानंतर बंगळुरूतील सेंटर ऑफ एक्सिलेंसच्या प्रमुखाची जबाबदारी लक्ष्मण यांच्याकडे सोपवण्यात आली होती.

भारताच्या न्यूझीलंड दौऱ्यासाठी झालेल्या संघ निवडीसाठीही लक्ष्मण उपस्थित होते. देवजीत सैकिया यांनी यामागचे कारणही सांगितले आहे. सेंटर ऑफ एक्सिलेंस आणि निवडकर्ते यांच्यातील ताळमेळ आणखी पारदर्शक व्हावा यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

खेळाडू दुखापतग्रस्त होण्याची संख्या दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. याचा परिणाम टीम कॉम्बिनेशनवर होतोय. जर व्हीव्हीएस लक्ष्मण मीटिंगमध्ये असतील, तर खेळाडूंच्या फिटनेसबाबत आणि पुनरागमनाबाबत माहिती देणे सोपे होईल. बीसीसीआयच्या आढावा बैठकीदरम्यान हा निर्णय घेण्यात आला असल्याचे देवजीत सैकिया यांनी सांगितले.

## भुवनेश्वर कुमारच्या टीम इंडियातील कमबॅकमुळे आरसीबीला बसणार फटका

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

सलग दोन आयपीएल स्पर्धेत भुवनेश्वर कुमारने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) संघासाठी चमकदार कामगिरी केली. या कामगिरीमुळे त्याचे टीम इंडियात पुनरागमन झाले असून बीसीसीआयच्या निवड समितीने न्यूझीलंडविरुद्धच्या टी-२० मालिकेत त्याची निवड केली आहे. या निर्णयाचा आरसीबी फ्रेंचायझीला फटका बसला आहे.

आयपीएल २०२८ स्पर्धेपूर्वी मेगा लिलाव होणार आहे. या स्पर्धेपूर्वी आरसीबीकडे भुवनेश्वर कुमारला अनकॅप्ड प्लेयर म्हणून घेण्याची संधी होती, पण आता गणित बदलेले आहे. एखादा खेळाडू सलग पाच वर्षे टीम इंडियाच्या प्लेइंग ११मधून बाहेर असेल किंवा बीसीसीआयच्या वार्षिक करारात



नसेल तर त्याला अनकॅप्ड प्लेयर म्हणून रिटेन करता येऊ शकते.

भुवनेश्वर कुमार मागच्या चार वर्षांपासून भारतीय संघ आणि वार्षिक कराराचा भाग नव्हता. नोव्हेंबर २०२७मध्ये त्याला पाच वर्षे पूर्ण झाली असती आणि त्याला अनकॅप्ड खेळाडू म्हणून रिटेन करता आले असते, मात्र आता ती शक्यता संपली आहे, कारण जसप्रीत बुमराहच्या गैरहजेरीत भुवनेश्वर कुमार न्यूझीलंडमध्ये टीम इंडियाचा मुख्य गोलंदाज असेल.

भुवनेश्वर कुमार हा एक चांगला गोलंदाज आहे, पण मागच्या काही वर्षांत त्याला भारतीय संघात स्थान मिळणे कठीण झाले होते. अखेर आयपीएल स्पर्धेत केलेल्या कामगिरीच्या जोरावर बीसीसीआय निवड समितीला विचार करणे भाग पडले. सलग दोन आयपीएल स्पर्धेत भुवीने आरसीबीसाठी चमकदार कामगिरी केली आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. —मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com